ग्रंथाली वाचक चळवळीचे

रुची

सप्टेंबर २००९ • मूल्य १० रुपये

डोंगराएवढा माणूस

महाराष्ट्राची मानसिकता काय?

– कुमार केतकर

राज्यशास्त्राच्या अभ्यासकांना मार्गदर्शक पुस्तके – सुशीलकुमार शिंदे

अरुण साधू

दिलीप चावरे

प्रवीण बर्दापूरकर

मधू शेट्ये

नीला उपाध्ये



! "# $
% & ( ) " * % %+
,- . # # /

‘महाराष्ट्राचा लेखाजोखा’ आणि ‘डायरी’
ही दोन मूळ ३४० रुपये
किमतीची पुस्तके
केवळ २५० रुपयांत घरपोच

ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

रुची

सप्टेंबर २००९
वर्ष २९ वे, अंक ९ वा, मूल्य १० रु.

संपादक : **दिनकर गांगल**
या अंकाचे संपादन : **धनंजय गांगल**
मुखपृष्ठ : **ग्रंथाली संगणक विभाग**

रुची – वार्षिक वर्गणी : १०० रुपये

डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, महापालिका शाळेची इमारत, पहिला मजला,
टोपीवाला लेन, डॉ. भडकमकर रोड पोलिस ठाण्यासमोर,
ग्रँटरोड, मुंबई ४०० ००७
☎ २३८९ २४ ४५ ● फॅक्स : २३८७ ५४ ८१
ग्रंथाली, इंडियन एज्युकेशन सोसायटीची म. फुले कन्याशाळा,
बाबरेकर मार्ग, दादर, मुंबई ४०० ०२८ ☎ २४४७ ४८ ४३
Email - granthali01@gmail.com

अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.

स. न.

स्वाईन फ्लू आणि भाजपमधील नाट्य यांमध्ये एक महत्त्वाची बातमी थोडी मागे पडली आहे. ती म्हणजे मुकेश आणि अनिल या रिलायन्सबंधूंमधल्या वादाची. त्याच्या मुळाशी आहे आंध्रप्रदेशच्या किनारपट्टीत, कृष्णा-गोदावरीच्या खोऱ्यात मुकेशच्या रिलायन्सला सापडलेला प्रचंड नैसर्गिक वायुसाठा. नुकतेच सरकारने रिलायन्सला हा वायू विकण्याची आधारभूत किंमत ठरवून दिली. ती म्हणजे $ 4.2/ mmBtu. खरे तर, ३-४ वर्षांपूर्वी रिलायन्सचे यासंदर्भात NTPC आणि अनिल अंबानी यांच्याशी याच्या जवळपास अर्ध्या किमतीत ($ 2.34) करार झाले होते. मात्र नव्या आधारभूत किमतीच्या निर्णयावरून मुकेश अंबानी यांनी हे जुने करार रद्दबातल ठरवले. त्यामुळे अनिल अंबानी यांचा उत्तर प्रदेशातील, दादरी येथील संकल्पित प्रकल्प आणि त्याची गणिते विस्कटून जाणार आहेत. याविरोधात NTPC आणि अनिल अंबानी यांनी कोर्टात याचिका दाखल केल्या आहेत. अनिल अंबानी यांनी तर जोरदार जाहिरातमोहीम उघडून, केंद्रीय पेट्रोलियम मंत्री मुरली देवरांनाच धारेवर धरले आहे. स्वतःच्या बचावासाठी मुकेश अंबानीही कोर्टात गेले आहेत. प्रकल्पाच्या गेल्या ८-१० वर्षांच्या काळात झालेले वेगवेगळे करार, वेगवेगळ्या सरकारी समित्यांचे निर्णय आणि आता कोर्टाचे निर्णय यामुळे एवढी गुंतागुंत निर्माण झाली आहे, की सरकारही पेचात सापडले आहे. NTPC ही सरकारी कंपनी असल्याने, रिलायन्सने NTPC ला जुनीच (स्वस्त) किंमत आकारावी अशी भूमिका सरकारने घेतली आहे आणि अनिल अंबानींना वाऱ्यावर सोडले आहे.

लोकशाहीत होणाऱ्या विकासात आपल्याला जास्तीत जास्त वाटा मिळावा म्हणून वेगवेगळे समूह धडपडत असतात. खाजगी गुंतवणुकीने त्याला वेगवेगळे आयाम मिळतात. उर्जेच्या स्रोताचे हे राजकारण आपल्या भावी जीवनाशी संबंधित आहे. ते समजून घेतले पाहिजे आणि आपल्या जाणिवा रुंदावल्या पाहिजेत. 'रुची' त्यासाठी एक साधन आहे. आपण अशा संवादात सहभागी व्हावे ही अपेक्षा.

पुढील अंक दिवाळी विशेषांक. तो ऑक्टोबर-नोव्हेंबर असा जोडअंक असेल. गणपतीत हजर झालेल्या पावसाने मने उल्हसित झाली आहेत. दिवाळी अंकात त्यास पूरक खाद्य मिळावे असा प्रयत्न आहे.

– संपादक

अनुक्रम

- **साथीच्या काळात../ ममता क्षेमकल्याणी** / २
- **डोंगराएवढा माणूस, निळूभाऊ/ सुषमा देशपांडे** / ५
- **महासत्ता आणि महाराष्ट्र/ रत्नाकर महाजन** / ९
- **मनभावन/ मंदाकिनी देशपांडे** / १२
- **प्रकाशन वृत्तांत** / १७
- **'मंडालेचा राजबंदी' आणि मी/अरविंद व्यं. गोखले** / २०
- **अज्ञाताचे विज्ञानपर्व/ अरुण निगुडकर** / २२

साथीच्या काळात साथी हात बढाना...!

ममता क्षेमकल्याणी

खबरदारीचे उपाय म्हणून हस्तांदोलन करणे टाळावे, रस्त्यावर थुंकणे टाळावे, डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय औषधे घेणे टाळावे, गर्दीच्या ठिकाणी जाणे टाळावे, बाहेरील अन्न पदार्थ खाणे टाळावे आणि आजारी व्यक्तींपासून दूर रहावे इत्यादी काळजी घेणे आवश्यक आहे. साबणाने हात स्वच्छ धुणे, पोषक आहार घेणे, सर्दी, ताप वाटल्यास त्वरित डॉक्टरांचा सल्ला घेणे, पुरेशी विश्रांती व झोप घेणे गरजेचे आहे. आजारी व्यक्तींनी डॉक्टरांच्या मार्गदर्शनानुसार औषधोपचार आणि आहार घेऊन घरीच रहाणे हितावह आहे.

यावर्षी श्रावणाच्या रिमझीम सरींचाच काय पण गणेशोत्सवाचाही मनमुराद आनंद आपल्याला घेता आला नाही. वर्षासहलींना जायचं नाही म्हणजे गरम भजी आणि टपरीवरच्या चहाचाही आनंद नाही. जिकडेतिकडे केवळ 'स्वाईन फ्लू'चाच विषय. या साथीच्या आजाराला रोखण्यासाठी आपण सगळे मिळून जी काही काळजी घेत आहोत ती आवश्यक आणि स्वागतार्हच म्हणायला हवी. मात्र यानिमित्ताने निर्माण झालेल्या काही प्रश्नांची चर्चा करण्याची आजही गरज आहे. पुण्यात मोठ्या प्रमाणावर झालेला फैलाव, बळींची वाढती संख्या, यंत्रेणेचा उडालेला बोजवारा असे अनेक मुद्दे आहेत. अशातच आता महाराष्ट्रात विधानसभेच्या निवडणुका जाहीर झाल्यामुळे या परिस्थितीत सर्वसामान्य माणसाला दिलासा मिळणार कसा हा एक मोठा प्रश्न आहे.

एप्रिल २००९ मध्ये 'स्वाईन फ्लू'चा पहिला रुग्ण अमेरिकेत आढळून आला. 'स्वाईन फ्लू' हा आजार 'एच१ एन१ नॉव्हेल व्हायरस' या विषाणूंपासून होतो. हा आजार साध्या फ्लूसारखा असल्यामुळे त्याची लक्षणंही अगदी सामान्य आहेत. 'स्वाईन फ्लू'च्या विषाणूचा प्रसार आता मानवाकडून मानवाकडे होत आहे. 'स्वाईन फ्लू'चा रोगी साधारणपणे सात दिवस या विषाणूंचा प्रसार करू शकतो. हा विषाणू दमट हवामानात आठ तास जिवंत राहू शकतो. मात्र 'स्वाईन फ्लू'वर निश्चित उपायसुद्धा आहेत. योग्य प्रतिबंध आणि वेळीच उपचार यांद्वारे 'स्वाईन फ्लू'ला आपण दूर ठेवू शकतो.

'स्वाईन फ्लू'मुळे बळी पडलेल्यांची एकूण संख्या ऑगस्ट महिन्याच्या अखेरीस पुण्यात ३१, राज्यात ५५ तर देशभरात १०२ इतकी झाली आहे. राज्यात 'स्वाईन फ्लू'मुळे तरुणांचा बळी सर्वाधिक गेल्याचे निरीक्षण तज्ज्ञांनी नोंदवले आहे. सातत्याने शिक्षण किंवा

कामाच्या निमित्त बाहेर राहणाऱ्या तरुणांचा यात समावेश आहे. ऑगस्ट महिन्याच्या मध्यंतरात शासकीय आरोग्य विभागाच्या एका जबाबदार अधिकारी व्यक्तीने 'स्वाईन फ्लू'चा विषाणू हा एक 'माईल्ड व्हायरस' असल्याचे विधान केले होते. त्या वेळेला 'हा विषाणू इतका 'माईल्ड' आहे तर त्यामुळे मृत्यू कसे ओढवले जातात?' असा सवाल अनेकांनी उपस्थित केला होता. यावर वैद्यकीय क्षेत्रातल्या तज्ज्ञांनी दिलेले उत्तर म्हणजे 'या आजारामुळे होणाऱ्या मृत्यूचा एकूण दर फारच कमी आहे!' 'विकासाचा एकूण दर', 'साक्षरतेचे एकूण प्रमाण' या संकल्पनांप्रमाणेच एखाद्या साथीच्या काळात 'मृत्यूचा एकूण दर' अशी संकल्पना मांडून साथ आटोक्यात असल्याचा खटाटोप करणे कितपत योग्य आहे? संख्याशास्त्राचे नियम कुठे आणि कसे लावावे याचे निकष पुन्हा एकदा तपासून पाहण्याची गरज यानिमित्ताने निर्माण झाली आहे. पावसाळ्याच्या दिवसांत नेहमी होणारा सर्दी, ताप, खोकल्यासारखा आजार आपल्या घरातल्या व्यक्तीला आपल्यापासून कायमचा हिरावून नेतो, या कल्पनेनेसुद्धा डोके सुन्न होते. घरातल्या एखाद्या व्यक्तीला नुसती सर्दी झाली तरी काळजात धस्स होते, अशी आज पुण्यातली परिस्थिती असताना शासन पातळीवर मात्र 'माईल्ड व्हायरस' म्हटले जाणे अनाकलनीय आहे.

मानवी सेवेचे व्रत?

मुख्य म्हणजे या साथीच्या आजाराचे निदान झाल्यानंतर त्यावर उपचार करण्याची परवानगी खाजगी रुग्णालयांना देण्यात आली नाही. साथीच्या काळात औषधांच्या होणाऱ्या

'ब्लॅक मार्केटिंग'सारख्या प्रकारांमुळे 'टॅमिफ्ल्यू' देण्याचे अधिकार फक्त शासकीय रुग्णालयांनाच देण्यात आले. विनाकारण या औषधाचे सेवन करणे आरोग्यासाठी अपायकारक असल्यामुळेही शासनाने ही खबरदारी घेतली असेल. मात्र यावर प्रतिक्रिया म्हणून की काय, अनेक खाजगी रुग्णालयातल्या डॉक्टरांनी अंगकाढू भूमिका घेतली. 'आपल्याला काही अधिकार नाहीत तर जाऊ देत रुग्णांना नायडू आणि ससूनमध्ये' असा अनेक खाजगी डॉक्टरांचा रोख होता. 'मानवी सेवेचे व्रत' म्हणून वैद्यकीय क्षेत्र निवडणाऱ्या डॉक्टरांची कमतरता या काळात खरोखरच जाणवली. 'स्वाईन फ्लू'वर उपचार करण्याचे अधिकार शासनाने खाजगी डॉक्टरांना दिले नाहीत हे मनात ठेवून सर्दी, खोकला झालेल्या प्रत्येक रुग्णाला नायडू किंवा ससूनमध्ये जाण्याचा सल्ला या काळात दिला गेला. यामुळे नागरिकांमध्ये घबराट निर्माण होण्याचे प्रमाण वाढले. सर्दी-खोकल्यावर तीन दिवस उपचार करून झाल्यानंतर घ्यायचे निर्णय तपासणीपूर्वीच घेण्यात आल्यामुळे भीतीचे वातावरण निर्माण झाले.

डॉक्टरांची बाजू

'स्वाईन फ्लू'वर उपचार करण्याचे अधिकार शासनाने न दिल्यामुळे याबाबतीत खाजगी रुग्णालयांनी किंवा डॉक्टरांनी 'रिस्क' का घ्यावी असा प्रश्न या डॉक्टरमंडळींनी केला. शासनाने न दिलेले अधिकार, डॉक्टरांवर विश्वास न ठेवण्याची वाढती प्रवृत्ती, सारासार विचार न करता किंवा पुरेशा माहितीअभावी, रुग्णाच्या मृत्यूचे खापर डॉक्टरांवर फोडणारा मीडिया आणि रुग्णाच्या मृत्यूनंतर डॉक्टरांना मारहाण व तोडफोडीचे वाढते प्रकार अशी सध्याची परिस्थिती वैद्यकीयक्षेत्रातल्या लोकांसाठी डोकेदुखी झाली आहे. अशा परिस्थितीत स्वत:चे नुकसान करून घेण्यापेक्षा सरकारी रुग्णालयातच जाण्याचा सल्ला अनेक खाजगी डॉक्टरांनी दिला. अनेक रुग्ण डॉक्टारांना आपली मेडिकल हिस्ट्री स्पष्टपणे सांगत नाहीत, डॉक्टरांनी सांगितलेले खबरदारीचे उपाय करत नाहीत, असेही काही डॉक्टरांचे म्हणणे आहे. सर्दी किंवा खोकला एका दिवसात बरा होत नाही म्हणून डॉक्टर बदलणारे रुग्णही आपल्याकडे आहेत. सर्दी-खोकला झाला म्हणून ऑफिसला सुट्टी घेऊन घरी बसणे काही रुग्णांना अतिशयोक्तीचेसुद्धा वाटते. ॲलोपथीच्या एका गोळीने त्वरित आराम मिळणार नसेल तर त्याचा उपयोग काय, असे प्रश्न विचारणाऱ्या रुग्णांवर डॉक्टरांनी उपचार कसे करावे? इकडे आड तिकडे विहीर अशीच या डॉक्टरांची परिस्थिती झाली हे देखील घेण्यासारखे आहे.

माध्यमांचा अतिरेक

खाजगी वृत्तवाहिन्यांची संख्या वाढल्यापासून कोणत्याही साध्या गोष्टी लोकापर्यंत पोचतात त्या अतिशय भव्य-दिव्य होऊन. पुरेशा माहितीअभावी वृत्त देणे, वारंवार एकच वृत्त दाखवणे, ॲनिमेशनसारख्या तंत्राचा वापर करून लोकांमध्ये उत्सुकता निर्माण करणे असे प्रकार वृत्तवाहिन्या अनेक घटनांच्या बाबतीत करताना दिसतात. त्याला 'स्वाईन फ्लू'तरी अपवाद कसा ठरणार? जनतेचे कैवारी असल्याचा आव आणत वार्तांकन करणाऱ्या या वाहिन्यांनी नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण करायला एक प्रकारे हातभारच लावला. 'स्वाईन फ्लू'मुळे मृत्युमुखी पडलेल्या रुग्णांच्या नातेवाईकांचा आक्रोश, घरातल्या लहान मुलांचे हताश चेहरे आणि अंत्यविधीचे चित्रिकरण करून ते लोकांपर्यंत पोचवण्यात आले. 'स्वाईन फ्लू'चा प्रश्न किती गंभीर आहे, हे दाखवण्यासाठी वाहिन्यांकडे केवळ हेच मार्ग उपलब्ध होते का? या साथीच्या निमित्ताने जनसामान्यांना दिलासा देणे, मार्गदर्शन करणे, एक व्यासपीठ मिळवून देणे, लोकांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी प्रयत्न करणे यासाठी माध्यमांनी पुढाकार घ्यायला हवा होता. सुरुवातीचे काही दिवस याबाबत ठळक वृत्त देणाऱ्या वाहिन्यांनी आता आपला मोर्चा इतर वृत्तांकडे वळवला आहे. यामुळे 'स्वाईन फ्लू' आटोक्यात असल्याचा भ्रमही जनमानसात निर्माण झाला आहे. प्रत्यक्षात परिस्थिती मात्र जैसे थेच आहे.

यंत्रणेचा बोजवारा

'स्वाईन फ्लू'चे निदान करण्यासाठी रुग्णाच्या नाक आणि घशातील स्त्रावाची तपासणी करावी लागते. पुण्यात राष्ट्रीय विषाणू संस्था अर्थात एन.आय.व्ही.मध्ये ही सुविधा उपलब्ध आहे. मात्र इथे केवळ पुण्यातल्याच रुग्णांच्या स्त्रावाची तपासणी होत होती असे नाही तर राज्यातल्या इतर भागांतूनही नमुने पुण्यात पाठवण्यात आले. त्यामुळे या व्यवस्थेवर मोठा ताण निर्माण झाला. औरंगाबादमधील काही रुग्णांचे नमुने तपासून परत पाठवायला सुमारे आठ दिवसांचा कालावधी लागला. त्यामुळे तिथल्या रुग्णांना सहन कराव्या लागलेल्या मानसिक तणावाची कल्पना यावी. पुण्यातील या साथीचा फैलाव आणि बळींची वाढती संख्या लक्षात घेता धास्तावलेल्या अनेक पुणेकर नागरिकांनी नायडू आणि ससून रुग्णालयात धाव घेतली. तपासणी करण्यासाठी तासन् तास उभे असलेले नागरिक, गर्दी आणि गोंधळाची परिस्थिती असेच चित्र त्यावेळी पाहायला मिळाले. तपासणीकेंद्रांवर डॉक्टरांची जादा कुमक तैनात करणे, वैद्यकीय महाविद्यालयातील शेवटच्या वर्षातल्या विद्यार्थ्यांना मदतीला घेणे किंवा त्यांनी आपणहून मदतीसाठी पुढे येणे खरे तर आवश्यक आणि अपेक्षित होते. 'उपायांपेक्षा प्रतिबंध चांगला' असे नेहमी म्हटले जात असले तरी प्रत्यक्षात 'स्वाईन फ्लू'चा फैलाव कमी करण्यासाठी युद्धपातळीवर प्रतिबंधात्मक उपाय करण्यात आले नाहीत हे वास्तव आहे.

यापूर्वी इतर देशांमध्ये या आजाराचा संसर्ग होण्यास प्रारंभ झाला तेव्हा त्यांनी प्रत्यक्षात आणलेल्या कडक उपायोजना आपल्याकडे कागदावरही आल्या नाहीत. इतर देशांमधून या साथीचा संसर्ग होत आहे म्हणून केवळ आंतरराष्ट्रीय विमानतळावर थोड्याफार प्रमाणात तपासणी करण्याचे नाट्य करण्यात आले. आंतर्देशीय अर्थात डोमेस्टिक विमानतळांवर तर त्याबाबत काहीच जागृती नसल्याचे चित्र पुढे आले.

सरकारी उपाय योजना!

महाराष्ट्रात होणाऱ्या साथीच्या विविध रोगांचा वाढता उद्रेक लक्षात घेऊन केंद्र सरकारने राज्यातील ३३ जिल्ह्यांमध्ये साथरोग शास्त्रज्ञ नियुक्त करण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यात 'स्वाईन फ्लू'सह मलेरिया, डेंग्यू, चिकूनगुनिया, चंडीपुरा, कॉलरा, गॅस्ट्रो, अतिसार आणि कावीळ अशा साथीच्या आजारांवर प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने शासनपातळीवर उपाययोजना केल्या जात आहेत. 'स्वाईन फ्लू'चा संसर्ग रोखण्यासाठी सर्व त्या उपाययोजना करण्यासाठी महापालिका आयुक्तांना विशेष अधिकार देण्यास राज्य सरकारने मान्यता दिली आहे. त्यामुळे हा आजार रोखण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांची वाट न पाहता महापालिकेस स्वत:च्या पातळीवर निर्णय घेता येणार आहेत.

शहरात साथीच्या आजाराचा फैलाव झाल्यास त्याला आटोक्यात आणण्यासाठी उपाययोजना करण्यासाठी आयुक्तांना विशेष अधिकार देण्याची तरतूद मुंबई महापालिका कायद्यात आहे. त्यानुसार आयुक्तांनी या अधिकाराचा वापर करावा, अशी मागणी करण्यात येत होती. प्रशासनानेही याबाबतचा प्रस्ताव राज्य सरकारकडे मंजुरीसाठी पाठवला होता. त्याला आता राज्य सरकारनेही मान्यता दिली आहे. पुणे शहरात 'स्वाईन फ्लू' संदर्भात तपासणी करणाऱ्यांची वाढती संख्या लक्षात घेऊन तपासणी केंद्रांची संख्याही वाढवण्यात आली आहे.

नागरिकांची भूमिका

पुण्यातला गणेशोत्सव म्हणजे गणेशभक्तांचा महापूर, असे म्हटले जाते. यंदा मात्र 'स्वाईन फ्लू'चा संसर्ग आटोक्यात आणण्यासाठी पुणे शहर आणि उपनगरांतील ७० टक्क्यांपेक्षा अधिक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी देखावे करण्याचे टाळले आहे. 'उत्सव हवा; गर्दी नको' या भूमिकेतून मंडळांनी गणेशोत्सव साधेपणाने साजरा करण्याचा निर्णय घेतला. पुण्यातल्या पारंपरिक विर्सजन मिरवणुकीलाही मोठ्या प्रमाणात फाटा देण्यात आला. दहीहंडी रद्द करून अनेक सार्वजनिक मंडळांनी आपली जबाबदारी पार पाडली आहे. विविध सामाजिक संस्था, संघटना, सार्वजनिक गणेश मंडळे आणि राजकीय पक्षांनी 'स्वाईन फ्लू'बाबत जनजागृती करण्याचे कार्य केले आहे. तसेच आयुर्वेद, होमिओपथी, निसर्गोपचार अशा विविध वैद्यकीय क्षेत्रांतल्या तज्ज्ञांनी सर्वसामान्यांना माध्यमांद्वारे मार्गदर्शन केले. यामुळे 'स्वाईन फ्लू'विरोधात प्रतिबंधात्मक उपाय करणे सर्वसामान्यांना सहज शक्य झाले आहे.

मात्र 'स्वाईन फ्लू'च्या निमित्ताने समाजातील आरोग्यविषयक जागृतीबद्दल अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. केवळ आपले घर स्वच्छ आणि नीटनेटके ठेवणारे लोक 'नागरिक' म्हणून समाजात वावरताना आरोग्यविषयक जबाबदारीचे भान राखतात का? 'रस्त्यावर थुंकू नये' यासारख्या पाट्या आपल्याला ठिकठिकाणी लावाव्या लागतात, इतकंच नाही तर दंडात्मक कारवाई करण्याचा इशाराही द्यावा लागतो, हे दुर्दैवच म्हणावे लागेल. या साथीच्या आजाराच्या निमित्ताने प्रत्येकाने आपल्या आरोग्यविषयक जबाबदारीचे भान राखले तर 'साथी हाथ बढाना' या संकल्पनेला खरा हातभार लागेल. 'स्वाईन फ्लू'चा विषाणू हा आज छोट्या स्वरूपात असला तरी त्याने भयावय स्वरूप प्राप्त करू नये यासाठी सर्वच पातळ्यांवरच खबरदारी घेण्याची गरज आहे. यासाठी चार महत्त्वाच्या पातळ्यांवर खबरदारीचे उपाय करणे आवश्यक आहे. सामुदाय, वैद्यकीय क्षेत्रातील व्यक्ती, वैयक्तिक पातळी आणि शासन पातळीवर दक्षता घेतल्यास ही साथ आटोक्यात आणण्यास निश्चितच मदत होईल.

- ममता क्षेमकल्याणी
विदिशा मिडिया नेटवर्क, ३०४,
३ रा मजला, 'धनश्री' स्वरनगरी सोसायटी,
सिंहगड रोड, पुणे-५१
भ्रमणध्वनी: 9881736078
mamata_kshem@yahoo.co.in

डोंगराएवढा माणूस, निळूभाऊ

सुषमा देशपांडे

निळूभाऊ...

काय लिहिणार या माणसावर!

या मातीतला हा माणूस, सर्वार्थानं.

गेल्या काही दिवसात माझी अनेक जवळची माणसं गेली. मृत्यू हे सत्य आपण स्वीकारलंय. मृत्यूनं डोळ्यांत पाणी वगैरे नाही येत आताशा, असं वाटत असताना डोळ्यांतून पाणी वाहायला लावणारे मृत्यू...

'निळूभाऊ गेलेत अशी बातमी आहे, पाहतेस हे खरं का?' एका पत्रकाराचा फोन आला त्या दिवशी आवंढा येणं, घशात काही होणं, असं झालं. बातमी खोटी ठरली त्यादिवशी, पण दुसऱ्या दिवसापासून निळूभाऊ अत्यवस्थ असल्याच्या बातम्या येऊ लागल्या. मला माहीतच नव्हतं निळूभाऊ इतके आजारी आहेत म्हणून. गार्गीच्या (निळूभाऊंची मुलगी) लग्नात भेटले तेव्हा हातात हात घेताना निळूभाऊंना ताप आहे अस लक्षात आलं. तसं म्हटल्यावर, 'हो. आताशा येतोच आहे ताप रोज. झालं आता वय.' निळूभाऊंच्या पद्धतीनं हसत निळूभाऊ म्हणाले. मला वाटतं, तेव्हाच त्यांच्या आजारानं शरीरात ठाण मांडलं होतं. मात्र मी अत्यवस्थेतल्या निळूभाऊंना पाहायला नाही गेले. नको वाटलं त्यांना तसं पाहाणं.

निळूभाऊ गेल्याच समजलं. त्यादिवशी वैकुंठात मात्र गेले. अफाट गर्दी. अनेक क्षेत्रातले लोक... गावागावांतून आलेले लोक... शेवटचं दर्शन. आणि निळूभाऊ आठवतच राहिले, राहतात.

त्यांना मी पहिल्यांदा पाहिलं ते 'एक गाव बारा भानगडी'मध्ये. बारामतीत दुर्गा चित्रमंदिर नव्यानं सुरू झालं होतं. पहिला चित्रपट लागला होता एक गाव बार भानगडी. खरं तर, नवीन थिएटर पाहणं म्हणून सिनेमाला गेलो. मात्र मला आजही त्यातले झेलेअण्णा आठवतात. मला त्यांचा हा पहिला चित्रपट वगैरेही माहीत नव्हतं, पण त्यांचं काम मनात घर करून राहिलं. अभिनेता निळू फुलेंची ही ओळख.

हा माणूस, माणूस म्हणून आपल्याला पुढे कधी भेटेल असं मनातही नव्हतं आलं तेव्हा. आणि निळूभाऊ कधी भेटले हे मला अजिबात आठवत नाही. मात्र आज निळूभाऊंबद्दल बोलायचं तर नेमकी कुठून सुरुवात करावी हेही खरंच समजत नाही.

साधा खादीचा लेंगा-झब्बा घालणारा, कोणाशीही सहज संवाद साधणारा हा माणूस. कमालीचा नम्र हसणारा, शांत पण ठाम बोलणारा हा माणूस. हातात एखादे वैचारिक पुस्तक, अर्थात गंभीर वाचन करणारा, सामाजिक- राजकीय विचार करणारा हा माणूस. कोणतीच पोझ नसलेला आणि विचार करतो तसंच वागणारा, जगणारा हा माणूस. त्यांच्या प्रकृतीला पूर्ण विसंगत असलेल्या भूमिकांसाठी ओळखला जाणारा अर्थात कमालीचा मोठा अभिनेता असणारा हा सच्चा दिल माणूस.

कुठून सुरुवात करायची यांच्यावर बोलायला!

निळूभाऊ 'कथा अकलेच्या कांद्याची' प्रयोग करत होते. विंगेतले शांत, नम्र निळूभाऊ आणि स्टेजवर मोकळं ढाकळं चौफेर राज्य करणारे निळूभाऊ. हाच का तो माणूस! म्हणायला लावणारे हे क्षण. याच लोकनाट्यात त्यांची एक एंट्री एकदम रंगीत पँट-शर्ट घालून असायची, हिप्पी म्हणून. विंगेत शांत उभे निळूभाऊ एंट्री घेताच जे काही बदलायचे की...! मला हे बदलणं पाहायला खूप आवडायचं. अनेक प्रयोग पाहिले मी आतून. माणूस आणि अभिनेता यातली ही विण पाहणं कमालीचा उच्च आनंद देणारी असायची. कसले बदलता तुम्ही आवाजासह! असं आपण म्हटलं तर पुन्हा नम्र हसत. हे काही विशेष नाही म्हणत.



निळूभाऊंचा 'सखाराम बाइंडर'मधला बाइंडर अंगावर यायचा. आपण त्यांना यावरून काही म्हणावं तर ते, 'ही भूमिका सापडायला फार वेळ गेला. सापडतच नव्हतं काही. तेंडुलकरांचं लेखन ताकदीचं आहे, ते फार मोठा लेखक असं म्हणत, सुलभानं (देशपांडे) माझं नाव सुचवलं होतं असं लगेच सांगून, सुलभाताईचं क्रेडिट तिला देऊन टाकत.' अत्यंत सहजपणे, मनापासून बोलत. त्यांच्या भूमिकेहून इतरांबद्दलची कृतज्ञता व्यक्त करत. 'बाइंडरचा लढा कमलाकर नेटानं लढला. मी फक्त अभिनय केला आहे.' हेही सांगत.

'सूर्यास्त'मधला अप्पाजीही खोलवर पोचायचा.अप्पाजींची अस्वस्थता त्यांच्या शारीरिक हालचालीतून, अगदी पाठीमागे अडकावलेल्या हातांच्या, बोटांच्या हालचालीतून आपल्याला अस्वस्थ करायची. त्यांचं कोणी कौतुक करावं यावरून, तर ते म्हणायचे, स्वातंत्र्यपूर्व काळ पाहिलेला आहे मी. मला स्वातंत्र्यसैनिकाची मानसिकता समजणं अवघड नसल्यानं ही भूमिका करणं अवघ़ड नाही गेलं.

चित्रपटांमधे मात्र त्यांच्याकडे पठडीतल्या भूमिका आल्या. तोच पुढारी, तोच बेरकी टोन. या भूमिका पोटासाठी करतो आपण, याचं भान असणाऱ्या निळूभाऊंना पुढे पुढे मात्र याचा कंटाळा आला होता. आज कोणावर रेप करायचाय? असं विचारतो मी, असं खेदानं हसत सांगायचे ते. सिनेमात रेप करताना नटी शांत पडून असते आणि नटाला खूप हालचाली कराव्या लागतात. त्रास होतो त्याचा असंही एकदा म्हणाले होते.

आपल्याला सामना, झेलेअण्णा-सारख्या भूमिका सोडल्यास खलनायकाच्या त्यांच्या भूमिका आठवतही नाहीत. मात्र पिंजरा चित्रपटातलं 'मास्तर तुम्ही मला मारलत!' म्हणत स्वत:च्या, अर्थात सोंगाड्याच्या जगण्यावर केविलवाणें हसणारे निळूभाऊ, ते हसणं अफाट असतं. सोंगाड्याच्या जगण्यातलं सत्य आपल्याला चर्र करायला लावतं. तसंच 'पुढचं पाऊल'मधे हुंड्यापायी अगतिक झालेल्या मुलीच्या बापाची भूमिका याच माणसानं आर्तपणे रंगवली. तो बाप, आजवर हातखंडा रंगवलेल्या खलनायकांहून पूर्ण वेगळा. तो बापही आपल्या मनात कोरला जातो. 'सिंहासन'मधल्या दिनूचही हसणं आपण विसरू नाही शकत. किती सहजपणे आपण त्यांना पत्रकार म्हणून स्वीकारू शकतो. हीच तर त्यांची अभिनेता म्हणून ताकद. त्यांना सिनेमात अजून वेगळ्या भूमिका मिळायला हव्या होत्या. शेवटच्या टप्यात तेच ते करायचं कंटाळा आलेल्या निळूभाऊंनी तरुण दिग्दर्शकांसह मात्र कामं केली. नव्या मुलांच्या कामाबद्दल उत्सुकता, सतत आशावादी असण्याचा त्यांचा स्वभाव हेच त्यास कारणीभूत होतं, असं मला वाटतं.

'हिंदी भाषेची मर्यादाच आहे मला' असं मोकळेपणानं हसत सांगणाऱ्या निळूभाऊंनी हिंदीतही काम केलं. पण मागणी असूनही थोडंच केलं. अभिनेता म्हणून त्यांची महाराष्ट्राला आणि महाराष्ट्राबाहेरही अभिमानास्पद ओळख होती. अभिनेता म्हणून त्यांची ताकद त्यांनाही माहीत होती आणि म्हणूनच ही ताकद त्यांनी त्यांच्या विचारांसाठी वापरली. विचारांमागे उभी केली. नाट्य-चित्रपट जगातल्या पडद्यामागे, स्टेजमागे काम करणाऱ्यांना त्यांनी दिलेल्या मदतीचे अनेक तपशील आपल्याला ऐकायला मिळत असतात. मी माळी म्हणून काम केलं आहे, मला माहीत आहे गरिबी, खालच्या स्तरावर काम करण्याचं दु:ख, असा अभिनवेशही त्यात नसायचा. कमालीची सहजता असायची त्यांच्या मदत करणाऱ्या हातात.

मला मात्र एक विचार घेऊन जगणारे निळूभाऊ फार थोर वाटतात. लहानपणापासून जातपात, स्तर न मानणारे निळूभाऊ रोजच्या जगण्यात कायम तसेच जगले. अभिनेता म्हणून नाव झालं, पैसा आला पण माणूस तोच राहिला. गोष्टी डोक्यात न जाऊ देण्यासाठी माणूस आतून खूप खरा असावा लागतो. अशी खरी माणसं सापडत नाहीत आता म्हणूनच निळूभाऊंचं असणं खूप महत्त्वाचं होतं, आहे.

निळूभाऊंनी राष्ट्रसेवादलाचा पूर्ण वेळ कार्यकर्ता म्हणून काम केलं होतं. परिवर्तनाच्या चळवळीशी ते फक्त जोडले गेलेले नव्हते तर या चळवळींचा ते भाग होते. म्हणूनच सामाजिक कृतज्ञतानिधीच्या संकल्पनेचे ते भाग होते. कार्यकर्त्याला जगायला किमान पैसे आपण उभे करून द्यायला हवेत हे खूप आतून वाटायचं त्यांना. निळूभाऊंनी यापलीकडे जाऊन कित्येक कार्यकर्त्यांना स्वत: आर्थिक मदत केली आहे. कित्येकांशी सामाजिक चर्चा करण्यासाठी वेळ दिला आहे. आपण मोठे नट आहोत, आपल्याला वेळ नाही असं चुकूनही कोणाला बोलल्याचं ऐकू येणार नाही. किंबहुना, कार्यकर्त्यांना आदरानं वागवणं, त्यांनी कामात टिकून राहावं म्हणून काही करणं ही त्यांना त्यांची जबाबदारी वाटायची. अनेकांना वैयक्तिक मदत केली आहे त्यांनी. त्याची मोजदाद तर नाहीच, पण आपण असे पैसे देतो कार्यकर्त्यांना, वेळ देतो असं खाजगीतही कोणाला ते बोलत नसत. असलं मोठेपण त्यांना नको होतं. या गावात हा काम करतो, कोणी नाटकाच्या दौऱ्यात त्यांना भेटायला आलं तर ते सांगत. कार्यकर्त्याचं खूप कौतुक करत. त्याला मी पैसे घ्यायला बोलावलंय असा पुसटसाही उल्लेख करत नसत.

निळूभाऊंना वेगळा विचार करणं, वाचणं हे वेड होतं. श्री.य. दाभोळकरांच्या १० गुंठ्याचा प्रयोग असाच त्यांच्यासाठी कुतूहल निर्माण करणारा शेतीतला प्रयोग होता. सिनेमात काम कमी केल्यावर निळूभाऊंनी हा प्रयोग करून पाहिला. मुळशी रस्त्यावर जमीन घेतली. तिथे राहतही ते. या अनुभवावर त्यांच्याशी बोलणं नाही झालं कधी.

मी 'सावित्री'चा प्रयोग केला तेव्हा निळूभाऊंना भेटल्याचं आठवतं. त्यांच्याशी सावित्रीची भाषा आणि कपडे यावर बोलायला गेले होते. शिकल्यावर भाषेत बदल करावा की नाही? हा प्रश्न होता. सावित्रीची साडी-चोळी कशी असावी, गळ्यात काय घालावं? असाही प्रश्न होता. कोणतीही साधी साडी

नेस. अगदी जोड साडी नेसलीस तरी चालेल. चोळी हातात, बाह्यात सैल घाल. माझी आई घालते तसंच घाल हे सांगताना एकदम म्हणाले होते, जोडवी घालायला हवीत. पूर्वी जाड जोडवी घालायच्या बायका. तशीच मिळाली तर बघ. गावाकडे मिळतील. एक एक गोष्ट डोळ्यांसमोर आणत बोलत होते. बहुतेक ते सोनाई, त्यांची आई डोळ्यांसमोर आणून बोलत होते. 'भाषेचं म्हणशील तर मला नाही वाटत ग्रामीण टोन बदलायला हवा. माणूस शिकला म्हणून बोली भाषा बदलत नाही. असं मला वाटतं.' पुढे म्हणाले, 'मी शिकलो नाही फार पण वाचतो थोडंफार, तुला माहीत आहे, म्हणून माझी भाषा बदलली का? सौंदर्यशास्त्रावरचं पुस्तक वाचून बोलण्याची भाषा नाही बदलणार. ग्रामीणच ताल असावा सावित्री- जोतिबांच्या भाषेला. तोच ठेवावास असं वाटतं. पाहा, म्हणजे तू...' अर्थात त्यांचं म्हणणं मला पटलं नसतं तरी त्यांना काही वाटलं नसतं. त्यांचं म्हणणं मी स्वीकारलं. मी सावित्री-जोतिबांच्या जगण्यावर प्रयोग करतेय याबाबत त्यांच्या डोळ्यांत चमकणारा आनंद मी अनुभवलाय. यावर कधी फार बोलायची वेळ मला नाही आली. कोणी भाषा बदलायला हवी होती असं म्हणल्यावर मी निळूभाऊंचा दाखला दिला होता, इतकंच. भाषेचा पोत सहजपणे समजावणाऱ्या निळूभाऊंनी किती सोपं करून सांगितलं होतं.

आता सारं आठवत राहतं.

माध्यमांचा वापर चळवळीत व्हायला हवा आणि तो हवा तसा होत नाही यावर त्यांच्याशी बोलणं व्हायचं. निळूभाऊंचं लोहियांच्या विचारांवर प्रेम आपल्याला माहीत आहे. लोहिया मांडायचे तो जात व वर्णभेद आपल्या मातीत रुजल्यामुळे होणारे प्रश्न आपण नाटकाच्या माध्यमातून मांडायला हवेत असं त्यांना वाटत होतं. निळूभाऊंनी काही पुस्तकं दिली मला. (आजही त्यातली काही माझ्याकडे आहेत.) आम्ही इंदूताई आणि आचार्य केळकरांना भेटायला गेलो. वाचन, चर्चा झाल्या. काही लिखाणही झालं. मात्र हे काम पूर्ण नाही झालं. दोन पेग घेतल्यावर ते लोहियांवर तार लागल्याप्रमाणे जे बोलत ते ऐकतच राहावसं वाटे. अक्षरश: लोहियांच्या विचारांची मैफल असायची ती. निळूभाऊ संध्याकाळी थोडी घेतल्यावर वेगळेच असायचे असं अनेकजण सांगतात. खरंच होतं ते. बोलण्यात वेगळाच ठामपणा असायचा. अत्यंत रुजू वागणारे निळूभाऊ खूप मोकळे- खुलकर बोलायचे. फारशी फिकीर न करता बोलायचे. अशा मैफलींसाठी आसुसलेले लोक मी पाहिले आहेत.

दारू पिणं निळूभाऊंनी कधीच लपवलं नाही. तसंच, मला वाटतं, लोहियांवरचं काम पूर्ण झालं नाही म्हणून कधी त्यांनी टोकलं नाही, तिरपे बोलले नाहीत. 'इच्छा असून नाही होत काही कामं पूर्ण.' बस इतकंच म्हणाले होते एकदा. मग हसले नेहमीप्रमाणे. कमालीचा पारदर्शक, सरळ माणूस.

निळूभाऊ तिच्या आईची गोष्ट अर्थात माझ्या आठवणींचा फड हा माझा तमाशातील स्त्रियांवर आधारित प्रयोग पाहायला आले होते. सृष्टी संस्थेनं प्रयोग आयोजित केला होता. अभिनयाहून तळागाळातल्या स्त्रियांचा मनापासून अभ्यास केला म्हणून त्यांना आनंद होता. सावित्रीनंतर मी हा प्रयोग करायला घेतला. हा प्रयोग सावित्री-जोतिबांच्या विचारांशी बांधिलकी दाखवतो असं त्यांना वाटलं होतं. नवनवीन प्रयोग पाहायला त्यांना मनापासून आनंद वाटायचा. 'लूज कंट्रोल' या दोन वर्षांपूर्वी केलेल्या नाटकाला येऊन त्यांनी, तरुण मुलांना असलेलं सेक्सविषयक कुतूहल असा विषय किती छान मांडला याचं कौतुक केल्याचं आठवतं. गार्गी प्रायोगिक रंगभूमीशी जोडली गेलेली असल्याचा त्यांना आनंद होता. नवीन काही करणाऱ्यांचं कौतिक होतं निळूभाऊंना. पाठ थोपटायला निळूभाऊ यायचेच.

दोन-तीन वर्षांपूर्वी, 'पृथ्वी थिएटरसाठी गार्गी वग करतेय, निळूभाऊ वग बसवायला तयार आहेत, दिग्दर्शन करताहेत ते,' असा कमालीचा आनंदून संजना कपूरचा फोन आला होता. निळूभाऊ वग वाचणार आहेत आज, हे समजताच मी त्या वेळेला त्यांच्या घरी पोचले होते. खरं तर, त्यांना खोकला झाला होता तेव्हा. बरा होत नव्हता खूप दिवस. त्रास होत होता तरीही थोडंफार वाचलं त्यांनी. मजा आली. खूप दिवसांनी तुमचं वाचन ऐकायला मिळणार, ही संधी का सोडा! असं मी त्यांना म्हणाले. हसले फक्त या मुलांचं ठीक आहे, पण तूसुद्धा! अशा अर्थाचं काहीसं बोलले. मला मात्र मूल होऊन त्यांना ऐकण्याची संधी सोडायची नव्हती.

गार्गीचा उल्लेख आला म्हणून सांगते, निळूभाऊ गार्गीचे खऱ्या अर्थानं मित्र होते. सख्खे. गार्गी बोलेल ते मोकळ्या मनानं ते ऐकायचे. तसंच तिच्या न पटणाऱ्या गोष्टी तिला ते सहजपणे सांगत. लेकीला चुकायला जणू परवानगी देणारा बाप होते ते. ते गेले त्यादिवशी माझ्या मनात आलेलं मी बोललेही, गार्गीचा सख्खा मित्र गेला म्हणून. त्यांना कधीतरी पालकसभेला बोलवायला हवंच होतं, बाप म्हणून.

सभेवरून आठवलं, निळूभाऊ अनेक सामाजिक, राजकीय सभांना जायचे. निळूभाऊंना नाही म्हणता येत नसे, भिडस्त होते ते, हे खरं होतंही. पण काँग्रेस, भाजपा-मधील मित्रानं बोलावलं म्हणून काँग्रेस, भाजपच्या सभांना ते गेले नाहीत. गेले नसतेच. विचारांचा पक्केपणा होता रुजलेला. तर कित्येक सभांना आपण असणं हीसुद्धा त्यांना त्यांची जबाबदारी वाटायची. विचारांची जवळीक असलेल्या लोकांसाठीच त्यांच्या मंचावर निळूभाऊ यायचे. आपला वापर गर्दी जमवण्यासाठी करतात का ही माणसं? असले प्रश्न त्यांना पडायचे नाहीत. पुढे, त्या पुढाऱ्यानं अनपेक्षित कोलांटी घेऊन काही वेगळीच भूमिका घेतली तर अस्वस्थ व्हायचे ते पण त्याच दु:खात रमणं त्यांच्या स्वभावात नव्हतं. तसंच पुन्हा कोणी सभेला बोलावायला आलं तर या या व्यक्तीनं हे असं असं केलं, तुमचंही तसंच झालं तर... सारख्या चर्चा त्यांनी केल्याचं ऐकिवात नाही. बदलासाठी झटणं

आपलं काम आहे, आशावाद कायम ठेवायला हवा असंच ते वागत.

सरकारविरोधी भूमिका घेणं हा त्यांच्या जगण्याचा भाग होता जणू, निळूभाऊंनी नम्रपणे पद्मश्री हा किताब नाकारला होता. सरकारी किताब घेणं त्यांना मान्य नव्हतं कारण सरकारचे आपण मिंधे असता कामा नाही असं त्यांना वाटायचं. हा पुरस्कार नाकारण्याचं त्यांनी प्रदर्शनही नाही केलं. उगाच स्मारकं उभी करणं, पुतळे उभारणंही त्यांना नाही आवडायचं. यावर निळूभाऊ गेल्यावर घडलेली घटना लिहिण्याचा मोह मला नाही आवरता येत आहे. निळूभाऊ गेले, छगन भुजबळांनी वैकुंठातच त्याचं स्मारक उभी करण्याची घोषणा केली. कुटुंबीयांना भेटायला भुजबळ घरी गेले. तेव्हा कुटुंबीयांतर्फे गार्गी मंत्रिमहोदयांना म्हणाली, आपण गैरसमज करून घेऊ नका. पण बाबाला स्मारकं करणं कधीच आवडलं नाही. तेव्हा त्याचंच स्मारक व्हावं हे आम्हा कुटुंबीयांना योग्य वाटत नाही. त्यांची आठवण म्हणून तुम्ही प्रायोगिक रंगभूमीला एक थिएटर मिळवून दिलंत तर बाबाला ते आवडलं असत. त्याचा विचार करावा.

विचार करतो तसं जगणारी माणसं आताशा नाही भेटत. आदर्श देणारी माणसं काही उरली आहेत? असे प्रश्न पडतात. या मातीतल्या माणसांचा विकास हे स्वप्न सतत तेवत ठेवून जगणारा हा माणूस, काय म्हणायचं त्यांच्याबद्दल? इतकंच म्हणुया, निळूभाऊ, तुम्ही सतत आठवत रहाल. तुमची आठवण काढणं ही आमची गरज आहे. विचार करतो तसं जगता यायला हवं. तसा प्रयत्न करण्याची ताकद देण्याची क्षमता, तुमच्या आठवणीत आहे.

– सुषमा देशपांडे
३९/३८ एरंडवन, ३ प्रसाद अपार्टमेंट,
प्रभात रोड, गल्ली क्रं.– ९,
पुणे – ४११००४

||ग्रंथाली||

'झपाटलेली झाडे'च्या प्रकाशन प्रसंगी
महेश केळुसकर, लेखिका सरोज जोशी, मधू मंगेश कर्णिक,
सतीश काळसेकर आणि अच्युत गोडबोले

प्रसिद्ध झाले

झपाटलेली झाडे

सरोज जोशी

१९८० नंतरच्या दशकात
प्रभावशील ठरलेल्या
निवडक कवींवर केलेलं
आस्वादात्मक समीक्षालेखन.

मूल्य २५० रुपये
सवलतीत १५० रुपये
घरपोच १७० रुपये

महासत्ता आणि महाराष्ट्र

रत्नाकर महाजन

महाराष्ट्र राज्य स्थापनेचे हे सुवर्णमहोत्सवी वर्ष. गेल्या ५० वर्षांत अनेक चांगल्या गोष्टी घडल्या आहेत तशाच काही गोष्टी करायच्या राहिल्या आहेत. त्यांचा मागोवा घेणे भविष्याच्या दृष्टीने योग्यच ठरेल. महाराष्ट्राचा विचार करताना भारताचा विचार करून त्या पार्श्वभूमीवरच महाराष्ट्राचा विचार करणे योग्य ठरेल.

येत्या १०-१५ वर्षांत भारत महासत्ता होईल असे भाकीत काहीजण वर्तवीत आहेत. परंतु आताची परिस्थिती पाहता हा आशावाद प्रत्यक्षात किती उतरेल हे सांगणे कठीण आहे.

मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी. मराठी माणसाचे अर्वाचीन मुंबईपुरते कर्तृत्व म्हणजे अमराठी दुकानांवरील पाट्यांना डांबर फासून त्या मराठीत लिहायला भाग पाडणे. हे करायलाही ५० वर्षे लागली हे विशेष! सुरुवातीच्या काळात मराठी लोकांना नोकऱ्या मिळवून देण्यात यशस्वी झालेली शिवसेना पुढील काही वर्षात राजकारण, अर्थकारण, हिंदुत्व यात अडकली व पुढे काय झाले ते सर्वश्रुतच आहे.

मराठी माणसाला दुहीचा शाप आहे. मनसे हे त्याचेच अपत्य म्हणावे लागेल. निवडणुकांत मराठी माणूस निवडून येणे दिवसेंदिवस दुरापास्त होत जाणार आहे. याचेही कारण आमच्यातली दुही हेच असणार. जातीतरी एकत्र आहेत का? अशा परिस्थितीत 'आम्ही' निवडणुका कशा जिंकणार व राज्य तरी कसे चालवणार?

शेतकऱ्यांच्या आत्महत्या-

महाराष्ट्रात हजारो शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. त्यांना कर्जमाफीची मलमपट्टी केली आहे. पण त्यांच्या मूलभूत समस्या काय आहेत हे जाणून त्यासाठी काय टिकाऊ उपाय केले पाहिजेत याचे निश्चित धोरण नाही. आजही शेतकरी निसर्गाच्या (पावसाच्या) लहरीपणावर अवलंबून आहे. अनियमित, अपुरा पाऊस हे आता नित्याचे झाले आहे. शेतकऱ्यांना त्यांच्या कष्टाच्या मानाने योग्य तो मोबदला मिळत नाही. सारा मलिदा मध्यस्थ-दलाल हडप करतात. त्यांचे कायमचे उच्चाटन करायला हवे. त्याचप्रमाणे खाजगी सावकारीही बंद पाडली पाहिजे. राष्ट्रीयकृत बँका आता खेडोपाडीही पोचल्या आहेत. विजेचा तुटवडा, पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष्य, केरोसीन-गॅसचा तुटवडा, महागाई यासारखे अनेक प्रश्न भेडसावत आहेत. ते कधी व कोण सोडवणार? सरकार चालवणाऱ्या पक्षांना स्वतःच्या अस्तित्वासाठी इतके झगडावे लागते की लोकांच्या प्रश्नांचा विचार करायला त्यांना फारसा वेळ उरत नाही.

नैतिक मूल्यांचा ऱ्हास-

स्वातंत्र्योत्तर काळात नैतिक मूल्यांचा ऱ्हास झाल्याचे प्रकर्षाने जाणवते. त्यामुळे देशप्रेम, देशासाठी स्वार्थत्याग इत्यादी गोष्टी लोप पावल्या आहेत. व्यसन म्हटले की आपल्याला आठवतात दारुडे, तंबाखू खाणारे, सिगारेट ओढणारे, जुगार खेळणारे वगैरे. परंतु ही व्यसने काहीच नाहीत अशी भयंकर व्यसने आजकाल आपल्या समाजात वाढलेली आढळतात. दुर्दैवाने त्यांना आपण व्यसन म्हणत नाही तर उलट अशा व्यसनी लोकांविषयी आपल्याला आदर, प्रेम वाटत असते! आपण त्यांचा उदो उदो करत असतो! ही व्यसने अशी - अगणित संपत्ती, मालमत्ता जमविण्याचे वेड, सत्तेची हाव, प्रसिद्धी लोलुपता, भ्रष्टाचार. ही व्यसने ज्यांना जडली आहेत त्यांच्यापैकी बहुतेकांच्या मनात कायम असुरक्षिततेची भावना असते. हीच मंडळी मोठमोठ्या देवस्थानांना भेटी देऊन लाखो रुपयांची, सोन्याची उधळण करत असतात. यातले देव काहीही घेत नाही हा भाग वेगळा!

सशक्त लोकशाही-

लोकशाही म्हणजे बहुसंख्य लोकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधींचे राज्य. याचाच अर्थ तत्त्वतः ५१% लोक ४९% लोकांवर राज्य करतात. ही पद्धत जरी सर्वस्वी निर्दोष नसली तरी त्यातल्या त्यात जास्त लोकप्रिय आहे. जगातले अनेक देश ही पद्धत पाळतात. या पद्धतीचे फायदे व तोटे आहेत. आमच्या बाबतीत मात्र फायद्यापेक्षा तोटेच अधिक आहेत. बहुसंख्य लोकांना चांगल्या-वाइटातला फरक कळतो व त्याप्रमाणे ते योग्य त्या पक्षाला, उमेदवाराला मत देतात असे गृहीत धरलेले असते. प्रत्यक्षात मात्र चित्र अगदी वेगळेच बघायला मिळते. लोक उमेदवार कुठच्या धर्माचा, जातीचा, भाषेचा याचा विचार अधिक करतात व एकगठ्ठा मते त्या उमेदवाराला देतात. शिवाय, पैशांचे आमिष दाखवून मते मिळवली जातात. धाकदपटशा, धमक्या देऊन मते मिळवतात. इतरही अनेक गैरप्रकार होत असताना दिसतात. याखेरीज मोठा दोष असा की बहुसंख्य लोक सुमार बुद्धीचे असतात. हुशार, विवेकी, विचारी लोकांची संख्या ही नेहमीच नगण्य असते. त्याचाच परिणाम म्हणजे ६० वर्षे उलटून गेली तरीही आपल्याकडे अजून निकोप लोकशाही नाही. कोणत्याही एका पक्षाला निर्णायक बहुमत मिळत नाही. आवळ्या-भोपळ्याची मोट बांधल्याशिवाय राज्य करता येत नाही. आता राज्यसभा हे बांडगूळ झाले आहे. ते लवकरात लवकर कापून टाकले

पाहिजे. निवडणुकीत हरले की राज्यसभेवर नियुक्ती करायची व मंत्रिमंडळात घ्यायचे यासाठी राज्यसभा वापरली जाते. राज्यसभेवर नियुक्त केलेले सभासद धड उपस्थितीही लावत नाहीत व कोणतेही महत्त्वाचे कार्य करताना दिसत नाहीत. त्याचप्रमाणे राज्याराज्यातून असलेल्या विधान परिषदाही काही खास उपयोगाच्या नाहीत. भरमसाठ पैसा मात्र खर्च होतो. तेव्हा त्याही बरखास्त कराव्यात. त्याचप्रमाणे राज्यपाल व शेरीफ ही दोन्ही पदे नाममात्र आहेत व पैशांचा अपव्यय करणारी आहेत. तिही बरखास्त करावीत. लोकशाहीला लागणारी पात्रता (Maturity) आज आमच्यात नाही हे कटू असले तरी सत्य आहे. येथे निवडून येणाऱ्या बहुसंख्य लोकांना लोकसभेत कसे वागावे याचे साधे भानही नसते हे आपण टी.व्हीवर नेहमीच बघत असतो. सुसंस्कृत लोक निवडणुकीपासून अलिप्त राहतात कारण झुंडशाहीच्या राज्यात ते निवडून येण्याची शक्यता खूप कमी असते. सुसंस्कृत उमेदवार आणि सुसंस्कृत मतदाता हे दोन्ही दुर्मीळ झाले आहेत.

मंत्री भ्रष्टाचार करूनही उजळ माथ्याने फिरतात. फारच अंगाशी आले तर राजीनामा देऊन मोकळे होतात. अशा भ्रष्ट लोकांना कोर्टाने 'पुराव्याअभावी' सोडून दिल्यास आपण 'निर्दोष' असल्याचा आव आणून निर्लज्जपणे जल्लोष साजरा करतात.

एका निवडणूकक्षेत्रातून निवडून यायची शाश्वती नाही म्हणून दोन दोन ठिकाणी निवडणूक लढवणे यालाच लोकशाही म्हणतात का? ज्या भागात उमेदवार राहत नाही त्या भागातून त्याला निवडणूक लढवायला परवानगी का व कशी दिली जाते?

सध्या अस्तित्वात असलेल्या पक्षांविषयी तुमचा भ्रमनिरास झालेला असेल व तुम्हाला योग्य वाटलेला चारित्र्यवान उमेदवार स्वतंत्रपणे निवडणूक लढविणारा असेल तर तोच उमेदवार निवडून येईल याची काय खात्री? चुकून निवडून आलाच तर तो एखाद्या पक्षाला जाऊन मिळणार नाही याची काय खात्री? स्वतंत्र राहिला तर तो एकटा विरोध दर्शविण्याखेरीज काय करू शकतो? असे अनेक प्रश्न उपस्थित होतात.

इंदिराजींच्या आणीबाणीला कडाडून विरोध करणाऱ्यांमध्ये ज्यांचे हितसंबंध गुंतलेले होते असे लोक पुढे होते हे समजण्यासारखे आहे. परंतु आम्ही मध्यमवर्गीयांनी आणीबाणीला विरोध करून आपल्याच पायावर धोंडा पाडून घेतला. आणीबाणीच्या काळात संप होत नव्हते, मोर्चे निघत नव्हते, कामे बिनबोभाट व नियमित होत होती, कर्मचारी वेळेवर कामावर जात होते, पैसे खाण्याचे काम थांबले होते. भ्रष्टाचार जवळजवळ नष्ट झाला होता. याचा मध्यमवर्गीयांना काय त्रास होत होता ते कळत नाही. सर्व काही अगदी सुरळीत चालले होते. पण आम्ही तथाकथित बुद्धिवादी आमची बुद्धी गहाण टाकून बसलो होतो. आमचे साहित्यिक इतर वेळी मूग गिळून वाटेल तो अन्याय निमूट सहन करतात, 'बैलांचा बाजार' अशी त्यांची संभावना होते पण आणीबाणीला मात्र त्यांनी कडाडून विरोध केला या दुर्दैवाला काय म्हणावे?

आज कोणाला निवडून द्यावे हा मोठा प्रश्न आहे, सगळेच एका माळेचे मणी. सध्या पैसा, पैसा आणि पैसा हा महामंत्र झाला आहे. पैसा हे साधन नसून साध्य झाले आहे. भाषावार प्रांत रचना करून भाषेभाषेत सामंजस्य निर्माण होईल, उत्कर्ष साधता येईल ही कल्पना चूक ठरली आहे. याला जबाबदार असलेले घटनेतील कलम बदलावे लागेल. कोणाही भारतीय नागरिकाला कोठेही जाण्याचा अधिकार देताना, बहुसंख्येने एकाच राज्यात, एकाच शहरात जाऊन तेथील सर्व सोयीसुविधांचा बोजवारा लावावा असा याचा अर्थ काढला जात आहे. तो सर्वस्वी चुकीचा आहे. तेव्हा घटनेतील त्या कलमाचा फेरविचार करून तो परत सुधारून करावा.

शिक्षण, शिक्षणसंस्था

गेल्या ६० वर्षांत शिक्षणाच्या सुधारणेच्या नावाखाली शिक्षणाचा पुरता खेळखंडोबा केला आहे. या क्षेत्रातील विद्वानांमध्ये एकमत नाही. एक निश्चित धोरण नाही. दरवर्षी काहीतरी नवी टूम काढली जाते व तिचा पाठपुरावा करण्याऐवजी ती अर्धवट सोडून दुसरी टूम काढली जाते. शिक्षण देऊन बेकार तरुण तयार केले जातात. आयुष्यात पुढे येण्यासाठी मदत होईल असे शिक्षण दिले जात नाही. काही थोडे अपवाद सोडले तर बहुसंख्येने कारकून तयार करणारे कारखाने असे या शिक्षणसंस्थाचे स्वरूप आहे. असंख्य मुले शालान्त परीक्षा पास करून पुढे न जाता लोडर, क्लीनर, हँडिमन, कुरिअर प्युन अशा नोकऱ्या करतात. काही वर्तमानपत्रे वाटपाचे काम-पार्ट टाइम करतात, व्यापार, तो किती का छोटा असेना, करायला मराठी माणूस सहसा तयार होत नाही. यात सुधारणा होत असली तरी अतिशय धीम्या गतीने होत आहे.

पोलीस

राज्यस्तरावर पोलिसांवर प्रचंड ताण पडत आहे. त्यातच अनावश्यक कारणासाठी पोलिसांचा वापर वाढत आहे. सरकारतर्फे सुरक्षाव्यवस्था खिरापतीसारखी वाटली जाते. सुरक्षा कोणास द्यावी, का द्यावी, किती काळासाठी द्यावी याचे नियम तपासून नवीन पद्धत अमलात आणावी लागेल. सध्या कोट्यवधींचा कर चुकवणारे, गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेले अशांनाही सुरक्षा पुरवली जाते! निरनिराळ्या क्षेत्रांतील दिग्गजांना, ज्यांच्याकडे अमाप पैसा असतो असे सिनेकलावंत, क्रिकेटपटू, राजकारण्यांचे नातेवाईक अशी ही यादी खूप मोठी आहे. हे सारे थांबवले पाहिजे.

न्यायव्यवस्था

स्वातंत्र्य मिळवून ६० वर्षे होऊन गेली तरी ब्रिटिशकालीन कायदे बदललेले नाहीत. ते बदलावेत असे सर्वांना वाटते. पण ते कोणी, कधी व कसे बदलावेत हे या क्षेत्रातील जाणकार व्यक्तीही सांगत नाहीत. प्रचलित

कायद्यात असंख्य पळवाटा आहेत. त्याही सर्वांना ज्ञात आहेत. पण त्या बदलणे सोयीचे नसल्यामुळे त्या बदलण्यासाठी कोणी काही करताना दिसत नाहीत.

न्याय दानात विलंब होतो याला जबाबदार कोण? 'टाइम्स ऑफ इंडिया'त आलेल्या वृत्तातील हे बोलके उदाहरण

(TOI) - 17-11-2008

'300 years to clear backlog'

'The courts in India are overburdened in such a way that it will take about 300 years to clear the backlog of cases even if no case is registered from today," Orissa high court Chief Justice B.S.Chauhan said while addressing a seminar.

CJI G. Balkrishnan had also addressed the issue and said each state should ask for more courts to bring down the pendency of cases. But he added that the judiciary was not getting whole-hearted support from the state governments concerned regarding setting up the courts.

यापेक्षा अधिक वाईट स्थिती काय असू शकते?

याखेरीज वैद्यकीय व्यवसाय, सरकारी-खाजगी बँका, प्रदूषण, ग्लोबल वार्मिंग असे अनेक प्रश्न आवासून उभे आहेत. यातून बाहेर पडायला खास प्रयत्न करायला हवेत. आज जे चालले आहे तेच जर पुढेही चालणार असेल तर महासत्ता वगैरे स्वप्नरंजनच राहील.

– रत्नाकर महाजन
३१५, बी विंग, मयूर पार्क,
मालविय रोड, विले पार्ले (पूर्व),
मुंबई – ४०००५७

खंड १



मूल्य २०० रुपये
सवलतीत १२० रुपये
घरपोच १४० रुपये

ग्रंथाली

महाभारतातील काही प्रसंग
विवेचन आणि रसग्रहण

अरुण जातेगांवकर । वासंती जातेगांवकर

. . . परस्परांशी निगडित असलेल्या त्या जीवनगाथा व्यासांनी अशा काही रचल्या आहेत की, त्या वाचताना त्यातली कथापात्रे तुमच्या-आमच्यासारखी खरी माणसे वाटू लागतात. त्यांची मने कळू लागतात. त्यांच्यामधले माया, मैत्री व निष्ठा; द्वेष, सूड व द्रोह; हे सारे भाव उमगू लागतात. आणि मग, व्यासांच्या कथापात्रांचे रागलोभ, हर्षखेद, आशानिराशा, मानापमान, यशाचे उन्माद आणि अपयशाचे दाह, हे सारे आपल्याला अशा काही आवेगाने येऊन भिडते की, आपण एक प्राचीन कथा वाचतो आहोत ह्याचे भान सुटल्यासारखे होते. . . .

. . . तिकडे द्रोण आपल्या उत्तराची वाट पाहत आहेत, हे युधिष्ठिराला जाणवते आहे. पण, त्यांना 'हत:' सांगायचे की 'अहत:' ? जयासाठी सत्याला तिलांजली द्यायची ? . . . सत्याचा आग्रह धरून पराजय पदरी घ्यायचा ? . . . 'हत:' की 'अहत:' ? . . . जय की पराजय ? . . .

युधिष्ठिराच्या मनात परस्परविरोधी विचारांचे हे असे द्वंद्व चालू असताना, द्रोणांवर कृष्णाचा 'योग' कसा करावा ह्याविषयी त्याला एक नामी युक्ती सुचते. . . . हत्ती ! तो हत्ती ! भीमसेनाचा तो हत्ती ! !

मनभावन

मंदाकिनी देशपांडे

तुला आणून माझ्या मुलाच्या हस्ते अंगणात रुजवलं, तेव्हा तो शाळकरी वयाचा होता, आणि तूही! जसं हे माहीत नव्हतं की तो पुढे कसा वाढणार आहे, काय शिकणार आहे, कुठल्या क्षेत्रात काय काम करणार आहे, तसंच, तूही किती उंचनीच होणार हे तर नव्हतंच माहीत; पण तुला फुलं-फळं येतात का, असतील तर काय रंगरूपाची हेही माहीत नव्हतं. मी चौथ्या मजल्यावर-तू अंगणात. तुझी सुरुवातीची देखभाल शेजाऱ्यांवर सोपवून मी मोकळी झाले माझ्या मुलाकडे पाहायला. तो चांगला उंच व्हायला लागला. इतका की कधीतरी गमतीनं मान उंचावून, वर पाहून मी त्याला म्हणायची, ''अरे, कुठे आहेस तू?'' तुझ्याकडे जाता-येता नजर गेली तरी ते तितपतच. रुजलास-वाढतोस एवढं नजरेत येण्याइतपत. तुझ्याबरोबरच आणून परिसरात आणखी काही वृक्ष लावून घेतले होते. जाता येता त्यांचीही तशीच दखल घेत होते.

परिसरात चिमण्या-कावळे-कबुतरांखेरीज पक्षी दिसत नसत, पण खिडकीतून बाहेर पाहिलं की वृक्षांची दाटी मात्र दिसे. गुलमोहर-पेल्टोफोरम फुलले की लाल-पिवळ्या बहरांकडे, पायतळी पडणाऱ्या फुलांच्या गालिच्याकडे लक्ष वेधत होतं. मध्येच केव्हातरी तुझ्या शेजारच्या आसुपालावर, मुठीत मावतील एवढे छोटेसे, हिरव्या पाठीचे, पिवळसर पोटाचे, बारीक चोचीचे पक्षी चिवचिवू लागले. मग हळूच एका पहाटे कोकिळानं साद घातली. आसुपालाच्या दाट पालवीत तो चुकतमाकत दिसण्यासाठी शोधाशोध करावी लागायची. पुढे जरा, पलीकडे लावलेल्या तामणीवर प्रथम फिके-जांभळे तुरे फुलले. पाठोपाठ फळंही लगडली. अपेक्षित होतं त्याप्रमाणे ती फळं खाण्यासाठी पोपट अवतरले.

एव्हाना उंच होत तू माझ्या नजरेच्या टप्प्यात आला होतास. प्रथम तुझ्या फळांकडे लक्ष गेलं. सुरुवातीला कैऱ्यांसारखी दिसणारी, तशीच गुलाबी छटा मिरवणारी ती फळं पुढे अगदी ओबडधोबड आकार घेऊन लालबुंद झालेली दिसली. पुढल्या साली, एके दिवशी अतिशय मधुर असा सुगंध दरवळला. पाहिलं तर तो तुझ्याच फुलांचा होता. खरं म्हणजे आधी लक्ष फुलांकडेच जायला हवं होतं. कदाचित सुरुवातीचा बहर फार कमी असावा. मग मात्र तुझं निरीक्षण करण्याचा छंदच लागला. ऋतूगणिक बदलणारी तुझी रूपं मोहवू लागली. तुझ्या तांबूस-कोवळ्या पालवीचं कौतुक करावं की भर दुपारी चमचम करणाऱ्या हिरव्या तजेलदार पानांचं? पानगळीच्या दिवसांत ताम्रवर्णाकडे झुकणाऱ्या पिकल्या पानांचं, की पिकून उलगडल्यावर खोलगट बशीसारख्या दिसणाऱ्या, बाहेरून लालबुंद, आतून थोड्या तपकिरी रंगाकडे झुकणाऱ्या फळांच्या लालसर कवचांचं? ही सुकलेली कवचं कधीतरी खाली पडतील आणि मी घरी आणून ती एखाद्या दुर्मिळ शोभेच्या वस्तूसारखी इथे तिथे मांडून ठेवीन असं किती वेळा मनात आलं. पण धुवांधार पावसानं ढकलून देईपर्यंत ती फांद्यांना चिकटून बसलेली आणि पावसात खाली पडल्यावर आपलं रंगरूप हरवून बसलेली! हिवाळ्याच्या दिवसांत फिकट-निळ्या आकाशाच्या पार्श्वभूमीवर निष्पर्ण फांद्यांचे बाहू उभारून, वसंताची वाट पाहणारं तुझं देखणं रूप मला वेळी-अवेळी खिडकीपाशी ओढून नेतं आणि अंगोपांगी फुलांचे तुरे बहरतात, तेव्हा तर काय 'मंद सुशीतल' झुळुकीबरोबर सुखाच्या लाटा सारख्या अंगावर येत राहतात. देठाशी गुलाबी छटा असलेल्या गोलसर, टपोऱ्या हिरव्या कळ्या उलगडतात. हळुहळू हिरव्या पाकळ्या किरमिजी होत जातात. पुढे पाकळ्या लालसर होत कडा किरमिजीच राहून फुलं पूर्ण उमलतात. पाठोपाठ मधमाश्या-रंगीबेरंगी कीटक तर मध खायला येतातच; पण पोपटांना ही फुलं इतकी आवडतात की त्यांच्या न चुकता रोज फेऱ्या सुरू होतात. फुलं खाता खाता तुरे देठात तुटायला आले, की एका पायात देठ पकडून, एका पायानं फांदी पकडून भरपेट नाश्ता होतो. फळांची कवचं उलगडली की कोकिळांच्या अशाच फेऱ्या सुरू होतात. कवचाला घट्ट धरून राहिलेली, दगडाच्या गोलसर गुळगुळीत काळ्या गोट्यांसारखी दिसणारी ही फळं, कोकिळ फळात तोंड घालून, प्रसंगी अगदी उलटं-पालटं होऊन, पंख पसरून गपागपा गिळतात. पानगळ झालेली असल्यामुळे ते स्पष्ट-स्वच्छ दिसतात. लालबुंद मण्यांसारखे डोळे आणि तुकतुकीत काळा रंग निरखता येतो. एकदा एकाच फांदीवर समोरासमोर बसून दोन कोकिळ जुगलबंदी करतानाही पाहिलं. कोकिळ नुसतंच कूजन करत नाहीत तर जोरजोरात कोकलतातही हे देखील कळलं. जवळपास असेल त्याला हाका मारून मारून हे सर्व दाखवणं आणि दूर असलेल्यांना फोनवरून वर्णनं ऐकवणं हा हल्ली मला एक उद्योगच झालाय! शेंड्यावर बसून 'एक मिनिट एक मिनिट' असं म्हणून हाक घालणारे बुलबुल, ठोक-ठोकच्या लयीत डावी उजवीकडे माना वेळावत आपले हिरवे-लाल रंग मिरवणारे तांबट आणि क्वचित कधीतरी, गोड शीळ घालणारा, काळ्या-पांढऱ्या पिसांची नक्षी असलेला, गुलाबी चोचीचा पिवळाधमक हळद्याही, तुझ्या अंगाखांद्यावर विसावले.

सध्या तर, एकाच वेळी पिकली पानं-हिरवी पानं, फळांची कवचं, फुलांचे भरगच्च

तुरे आणि 'किसलय' हा शब्दच जिला शोभावा अशी लोभस कोमल नवपल्लवी, असा संपूर्ण सौंदर्यसाज लेऊन तू उभा आहेस. भरदुपारी तुझ्या रूपाला उन्हानं झळाळी येते अन् ती कोवळी पालवी तर सोन्याची झुंबरं झुलावीत तशी दिसते. पहाटे जाग येते तोच, भूल घालणारा मधुगंध श्वासात सामावतो. दिवसभर माझं घर सुगंधानं दरवळलेलं असतं. श्वासात भरून घेता घेता तो गंध जिभेवर उतरतो, तो अनुभव तर ज्यानं त्यानं प्रत्यक्षच घ्यावा! 'की इंद्रिया लागे कळंभा' अशीच होते माझी अवस्था. होळी जवळ आली आहे. तू खेळत असलेली ही होळी किती नितान्तसुंदर असते!

सगळी वसुंधरा आपल्या मालकीची असल्याच्या भ्रमात इथल्या प्रत्येक वस्तूचं मोल माणूस ठरवत आलाय. फळं-फुलं-भाज्या, जमीन-जुमला-शेतीवाडी हेच नव्हे, पाण्यालाही मूल्य आहे. माणसाच्या जिवाचं, त्याच्या जखमेचं, त्याच्या बलिदानाचं, अपमृत्यूचं मोल ठरतंय. शक्य तर, उद्या प्राणवायूही विकला जाईल. सध्याही तो रुग्णाला विकत घ्यावा लागतोच. किती ते आठवत नाही, पण तुलाही मी पाच की पन्नास रुपये मोजून विकतच आणलं होतं. जसं मोल ठरवतो तसं आपापल्या भाषेत प्रत्येकाचं नामकरणही करतो. ते करताना बऱ्याच वेळा आपल्या अल्पमतीची आणि अरसिकत्वाची साक्षही देतो. तुझ्या राजस रूपाला साजेसं नाव मला सुचलेल नाही. असलेलं नाव माहीत असण्याएवढा माझा अभ्यास नाही. पण आज तू जी भरभरून आनंदाची उधळण माझ्यासाठी करतो आहेस, त्याचं मोल ना मी माझ्यापुरतं ठरवू शकते ना तो आनंद कुणाच्या ओंजळीत तोलूनमापून घालू शकते! सुखाची भांडारं माझ्यासाठी रोजच खुली करणाऱ्या तरुवरा, तुझी ऋणी आहे. कायमचीच!

– मंदाकिनी देशपांडे
१७ बी, ४था मजला, मयूर सोसायटी,
एम.टी.एन.एल. मार्ग,
दादर (पश्चिम), मुंबई – ४०० ०२८
दूरध्वनी : २४२२ ०६७९

ग्रंथात्मी

सौदीच्या अंतरंगात

पद्मा कऱ्हाडे

सौदी अरेबियामध्ये पाच-सात वर्षे रहिवास केल्यानंतर झालेल्या त्या देशाचे आकलन. त्यामधून वाचकाला एका वेगळ्या जीवनपद्धतीची ओळख जशी होते, तसेच लेखिकेच्या मनोवृत्तीत झालेले परिवर्तनही कळून येते. तिने ही शैली किती सहज आत्मसात केली आहे! ती त्या शैलीचे वर्णन करते, वानप्रस्थातील एकांतवास!

मूल्य २०० रुपये
सवलतीत १२० रुपये
घरपोच १४० रुपये



जनसंवाद

त्रैमासिक सर्वसाधारण सभेचा अहवाल

'जनसंवाद'ची पहिली त्रैमासिक सर्वसाधारण सभा शनिवार, ८ ऑगस्ट रोजी पुण्यातील विद्यार्थी साहाय्यक समितीच्या आपटे विद्यार्थिगृहाच्या सभागृहात झाली. पुण्यात त्यावेळी स्वाईन फ्लूच्या साथीचा जोर नुकताच सुरू झाला होता, आणि संयोजकांनी परगावहून सभेसाठी येणाऱ्या सदस्यांना तसे कळवले होते. लातूरचे मच्छिंद्र गोजमे, जे पुण्यातच होते, त्यांच्याखेरीज सर्व उपस्थिती पुण्यातील सदस्यांचीच होती.

सभेला दोन विशेष पाहुणे उपस्थित होते व मुख्य म्हणजे ग्रंथालीने इंटरनेवरून इमेलद्वारे केलेल्या सामायिक आमंत्रणाला त्यांनी प्रतिसाद दिला होता. ही गोष्ट माध्यमांचे प्रचारातील स्थान स्पष्ट करून गेली.

बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या वृत्तविभागाच्या संपादिका, विनता कुळकर्णी, त्या सुमारास पुण्यात होत्या व त्या संपूर्ण दिवस सभेत सहभागी झाल्या. एवढेच नव्हे, तर परतल्यावर त्या व त्यांची संस्था चळवळीला हातभार लावण्यासाठी प्रयत्न करतील, हे आश्वासनसुद्धा त्यांनी अध्यक्षांना दिले.

दुसऱ्या पाहुण्या होत्या किशोरी गद्रे. त्यासुद्धा स्वतः पुढाकार घेऊन दिवसभर उपस्थित राहिल्या व त्या चळवळीच्या सदस्यदेखील झाल्या. महाराष्ट्र राज्याच्या शासकीय सेवेत डेप्युटी कलेक्टर ह्या पदावर हक्क ठेवून सध्या त्या मराठा चेंबर ऑफ कॉमर्सच्या सामाजिक कामाशी निगडीत असलेल्या 'जनवाणी' ह्या संस्थेचे संचालकपद सांभाळतात.

नवीन सदस्यांची ओळख करून देण्याच्या निमित्ताने सकाळच्या सत्राला अनौपचारिक गप्पांनी सुरुवात झाली. ओळखीबरोबर, करत असलेल्या सामाजिक कार्याची माहिती उपस्थितांनी एकमेकांना करून दिली आणि त्या अनुभवांवर चर्चा झाली. जोडीला, गेल्या तीन महिन्यांत जनसंवादच्या प्रचारकामाचा व चळवळीशी नवीन सदस्य जोडून घेण्यातील प्रयत्नांचा आढावा घेतला गेला. व्यक्त झालेल्या काही ठोस गोष्टी, काही विचार–

१. जनसंवादसाठी अध्यक्षांनी घेतलेला पहिला निर्णय होता तो सल्लागार मंडळ नेमण्याचा अशी सुरुवात करून अध्यक्षांनी सांगितले, की आनंद आगाशे, विद्या बाळ, असीम सरोदे, राज्यश्री क्षीरसागर, जयंत नेने व धनंजय गांगल ह्या सदस्यांची एक सल्लागार समिती दर महिन्याच्या पहिल्या शनिवारी अध्यक्षांबरोबर बैठक घेऊन चळवळीला मार्गदर्शन करते.

२. वैयक्तिक संपर्क साधलेल्या व्यक्तींतून किमान पंधरा टक्के प्रत्यक्षात सदस्य होतात असे किर्लोस्करवाडीच्या वसंत आपटे ह्यांच्या संदर्भातील प्रयत्नातून नजरेस आले. सदस्यांच्या संख्येत वृद्धी साधण्याचा तो एक सोपा व किमान खर्चाचा मार्ग आहे. जनसंवादच्या प्रत्येक सदस्याने ह्या मार्गाचा विचार करावा अशी विनंती अध्यक्षांनी सर्वांना केली.

३. समाजाच्या सर्व क्षेत्रांत अनैतिकता अनुभवास येते; फक्त राजकारणातच येते असे नव्हे. म्हणूनच, राजकारणात कार्यरत असणाऱ्या सत्प्रवृत्तीच्या व्यक्तींनासुद्धा चळवळीशी जोडून घेण्याकरिता विशेष प्रयत्न केले पाहिजेत, असे प्रतिपादन प्रा. धनागरेंनी केले.

४. स्वतः करण्यापेक्षा करून घेण्याकडे चळवळीचा भर असला पाहिजे, कारण चळवळ शासनाविरुद्ध नसून लोकशाही मार्गाने गेली पाहिजे. 'काय झाले पाहिजे' ह्यावर लक्ष केंद्रित करून 'ते कसे साधायचे' ही बाब त्या त्या यंत्रणेवर सोपवावी. काय व्हायला पाहिजे हे त्या त्या विषयासाठी जनसंवादने ठरवावे व ती गोष्ट शासनाकडून करुन घेण्यासाठी गरजेचा असा, नागरिकत्वाच्या तत्त्वांबाबत जागरूक असलेला समाज (सिव्हिल सोसायटी) निर्माण झाला पाहिजे. ते चळवळीचे दूरगामी लक्ष्य असावे, असे किशोरी गर्दे ह्यांनी आवर्जून सांगितले.

५. बऱ्याच सदस्यांकडून असे मतप्रदर्शन झाले की चळवळीचे स्वरूप ढोबळ वाटते, ते निवडलेल्या ठोस कार्यक्रमांतून स्पष्ट झाले पाहिजे. सदस्यवृद्धीसाठी प्रयत्न करताना सदस्यांना ही अडचण खास करून जाणवली.

पहिल्या अनौपचारिक सत्राचा समारोप करताना अध्यक्षांनी सांगितले, की 'चळवळीचे स्वरूप' ह्या विषयावर भोजनोत्तर एक विशेष सत्र आयोजित केले आहे. त्यानंतर, जनसंवादने हाती घेतलेल्या, दिवाळी विशेषांकांच्या माध्यमातून घ्यायच्या स्पर्धेचा अहवाल अध्यक्षांनी सादर केला. अहवाल व संबंधित चर्चेतील महत्त्वाचे मुद्दे–

१. वेळापत्रकानुसार चालू आहे. निमंत्रित केलेल्या प्रकाशनांकडून पुरेसा प्रतिसाद लाभला आहे; मात्र मुंबई–पुण्याकडील व इतर प्रथितयश प्रकाशनांकडून झालेले दुर्लक्ष अध्यक्षांनी नजरेस आणून दिले.

२. खरे तर, लाभलेला सहभाग खूप चांगला आहे, तरीही प्रतिसाद न दिलेल्या प्रकाशनांशी त्या संबंधात बोलले पाहिजे, असे मत धनागरेंनी व्यक्त केले. अनेक वेळा नित्य कामाच्या गडबडीत अशा उपक्रमाकडे संबंधितांचे दुर्लक्ष होऊ शकते ही बाब

स्वानुभवातून धनंजय गांगल ह्यांनी नजरेस आणून दिली.

३. असे मत व्यक्त झाले, की सर्व भौगोलिक विभागांतून व खास विचाराधारा जपणाऱ्या प्रकाशनांकडून पुरेसा प्रतिसाद आला नसेल तर त्या त्या प्रकाशनाबरोबर विशेष संपर्क साधावा. अध्यक्षांनी ती सूचना मान्य केली.

४. स्पर्धेच्या खर्चासाठी आर्थिक साहाय्याचे धनादेश यायला सुरुवात झाली असून उपक्रमाची घडी बसल्यावर अर्थसाहाय्याकरिता विशेष प्रयत्न करण्यासाठी अध्यक्षांनी सदस्यांना विनंती केली.

४. एकूणच, प्रस्तुत उपक्रम योग्य रीतीने पुढे जात असून, त्या उपक्रमाद्वारे जनसंवादच्या विचारांचा प्रचार राज्यभरात होईल आणि चळवळ महाराष्ट्रातील तालुक्यातालुक्यापर्यंत पोचेल असा अंदाज व्यक्त करून, वाचकांचा स्पर्धेतील सहभाग वाढवण्याच्या दृष्टिकोनातून पुढील सूचना केल्या गेल्या.

४.१ शासनाच्या जिल्हा पातळीवरील जनसंपर्क अधिकाऱ्यांबरोबर संपर्क साधून उपक्रमाचा आवाका व स्वरूप त्यांना स्पष्ट करावे आणि त्यांच्याकडून गावोगावी स्पर्धेची प्रसिद्धी साधावी.

४.२ महाराष्ट्रात पाचेक हजार कॉलेजेस आहेत आणि विद्यार्थी व अध्यापकांना स्पर्धेत सहभागी करून घेणे चळवळीच्या उद्दिष्टांशी निगडीत आहे. म्हणून, राज्यातील विद्यापीठांच्या 'रजिस्ट्रारां'मार्फत गावागावांतील प्राचार्यांना स्पर्धेबाबत गरजेची माहिती द्यावी आणि कॉलेजांच्या सूचनाफलकाद्वारे विद्यार्थ्यांना आणि प्राध्यापकांना आवाहन करावे.

४.३ गावागावांतील, शहरांतील दैनिकांकडे 'प्रेस नोट' पाठवून स्पर्धेची बातमी ठिकठिकाणच्या दैनिकांत देण्यासाठी विनंती करावी.

४.४ वाचकांचा सहभाग वाढवण्यासाठी जनसंवादच्या सदस्यांनी विचार करावा व सुचलेल्या इतर कल्पना स्पर्धासमितीला कळवाव्या.

५. लाभलेल्या सर्व सूचनांवर विचार करून योग्य कारवाई करण्याचे आश्वासन अध्यक्षांनी स्पर्धासमितीच्या वतीने दिले.

भोजनोत्तर सत्राचे अध्यक्षपद लातूरचे मच्छिंद्र गोजमे ह्यांनी स्वीकारले. चर्चासत्राचा विषय होता- 'जनसंवादच्या कार्यक्रमांचे स्वरूप- काय करायचे, कसे करायचे, काय टाळायचे आणि कशाला अग्रक्रम घ्यायचा.'

चर्चासत्राची सुरुवात राज्यश्री क्षीरसागर ह्यांनी स्वतः पुढाकार घेऊन पुण्यात स्थापन करत असलेल्या जनसंवादच्या एका गटाची पार्श्वभूमी मांडून केली. मुख्य अनुभव होता तो अध्यक्षांबरोबरच्या चर्चेतून अशा स्थानिक गटांनी सुरू केलेल्या कामाला जनसंवादची अधिकृतता लाभण्याचा, त्या गटाने जनसंवादचे नाव वापरण्याचा, कामातील संपर्काकरिता पत्रव्यवहार करताना जनसंवादचे लेटरहेड वापरण्याचा.

खुलासा करताना गोजमे म्हणाले, की जनसंवादची पथ्ये पाळून कोणत्याही सामाजिक कामाला जनसंवादची अधिकृतता लाभण्यास अडचण येऊ नये. ह्या गोष्टीचे स्पष्टीकरण करताना चळवळीच्या नियतकामाचे निवेदन -'मिशन स्टेटमेंट'- पुरेसे बोलके असावे असे प्रतिपादन करून गोजमे ह्यांनी सुचवले, की लोकशाही, नागरिकत्व व नागरी समस्यांचे निवारण ह्या विषयांचा नियतकार्याच्या निवेदनात उल्लेख असावा. त्यानुसार, सुधारित 'मिशन स्टेटमेंट' सादर करण्याची जबाबदारी गोजमे ह्यांनी स्वीकारली.

चर्चा दोन मुद्यांवर विशेष रंगली. एक गट होता तो समाजाच्या वृत्तीपरिवर्तनावर भर देणाऱ्यांचा, तर दुसऱ्या गटाचे म्हणणे होते की वृत्तीबदलापेक्षा प्रशासनाच्या चुकीच्या वा कालबाह्य पद्धतीत सुधारणा साधणाऱ्या कामांना अग्रक्रम दिला पाहिजे. राजीव साने ह्यांनी चलन (करन्सी) नियंत्रित करण्याकरिता सुरू झालेली अर्थक्रांती ही चळवळ व 'पब्लिक डिस्ट्रिब्युशन सिस्टिम, ज्याला गैरसमजूतीतून आपण 'रेशनिंग' असे संबोधतो, ह्या उदाहरणांद्वारे त्यांचे विचार समर्पक व सविस्तर मांडले.

चर्चेच्या समारोपात सत्राचे अध्यक्ष गोजमे ह्यांनी मांडलेले विचार-

१. बहुतेक व्यक्ती जनसंवादचे सदस्य होण्यापूर्वी त्यांच्या त्यांच्या निवडलेल्या सामाजिक कामात व्यस्त होत्या; तरीही त्यांना जनसंवादसारख्या चळवळीत रस आहे. जनसंवाद ही एखादी सामाजिक संस्था नसून चळवळ आहे. विविध प्रकारचे सामाजिक काम करणाऱ्या व्यक्तींना, गटांना, संस्थांना उपलब्ध झालेले ते एक व्यासपीठ आहे.

२. समाजाच्या वृत्तीबद्दल व प्रशासकीय पद्धतीतील सुधारणा, म्हणजेच व्यवस्थापरिवर्तन, ह्या दोन्ही गोष्टींवर जनसंवादचे सदस्य काम करू शकतात. सुरुवातीला कोणतेही कार्यक्रम जनसंवादसाठी साध्य न मानता, प्रचार व सदस्यवृद्धीसाठी महत्त्वाचे आहेत.

३. जसजशी चळवळ पुढे सरकेल, सदस्यांच्या, गटांच्या कार्यक्रमांना अनुभवातून जशी धार येईल, तव्दत त्या त्या कामाचा प्रभाव चळवळीवर पडेल.

४. जनसंवादच्या अधिकृत माहिती- पत्रकांतून ह्या विषयावर मांडणी करता येईल व ते काम लवकर हाती घेण्याची गरज आहे.

५. दरम्यान, पुण्यात राज्यश्री क्षीरसागरांनी स्थानिक गटाची स्थापना करण्याकरिता जसा पुढाकार घेतला आहे तसे

बोले तैसा चाले

'जनसंवाद'चे सदस्य
प्रा.डॉ.द.ना. धनागरे यांना
विद्यापीठ अनुदान आयोगातर्फे
त्यांच्या समाजशास्त्रातील
विशेष योगदानासाठी
स्वामी प्रणवानंद सरस्वती पुरस्कार
घोषित झाला आहे त्याबद्दल
त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन

गट ठिकठिकाणी निर्माण करून गटागटांना विविध कार्यक्रम राबवता येतील व त्या प्रयत्नांतून चळवळीच्या सदस्यांची संख्यावृद्धीपण साधता येईल.

६. चळवळीतून कोणत्याही प्रकारचा ठोस बदल साधण्यासाठी चळवळीकडे गरजेची शक्ती असली पाहिजे. असे संख्याबळ सदस्यवृद्धीतूनच निर्माण करता येईल; सुरुवातीला तरी ह्या गोष्टीकडे दुर्लक्ष होता कामा नये.

ह्या चर्चेनंतर पुढील सभेची तारीख ठरवून चर्चेची सांगता झाली. त्या संदर्भात, त्रैमासिक सभा दुसऱ्या शनिवारऐवजी रविवारी घ्यावी असे ठरले. विद्यार्थी साहाय्यक समितीच्या सभागृहातच पुढील बैठक रविवार, ८ नोव्हेंबर २००९ ह्या दिवशी सकाळी १०.३० ते सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत घेण्याचे ठरले.

कार्यक्रमाचा समारोप करताना अध्यक्षांनी विनंती केली, की त्रैमासिक सभेला उपस्थित राहणार अथवा नाही हे स्वतःहोऊन, पुढाकार घेऊन प्रत्येकाने किमान एक आठवडा आधी संयोजकांना कळवावे.

– अभय पाटील, पुणे
दूरध्वनी : ९८९०१ १६७९१

'पाण्याचा एक पेला दिला' हे समाधानही खूप आहे. अशा अर्थाच्या 'हेडलाईन'ने माझे त्या लेखाकडे लक्ष गेले. 'देण्याचा सप्ताह' असा उपक्रम सप्टेंबर २७ ते ऑक्टोबर ३, २००९ ह्या आठवड्यात भारतभर साजरा करण्याचा वेंकट कृष्णन ह्यांचा इरादा आहे. सचिन तेंडुलकर, अझिम प्रेमजी, चेन्नईतील ऑटोरिक्शा युनियन, मुंबईचे डबेवाले आणि १०१ हौशी चित्रपट निर्माते ह्या उपक्रमात सामील होणार आहेत.

हा उपक्रम कशाकरिता हे सांगताना वेंकट म्हणतात, की 'देण्या'च्या क्रियेतूनच समाज एकत्र येईल; अनुभवास येणाऱ्या नागरी, लिंग, जात, वर्ग ह्या सर्व विभाजनवादी वृत्तींवर मात करून!

देणे ही स्वयंस्फूर्त प्रक्रिया आहे. प्रगती आणि विषमतेने ग्रासलेल्या ह्या देशातील नागरिकांना समाजाला 'काहीतरी देण्याची' ही उत्तम संधी आहे.

विशेष माहितीसाठी मदत केंद्र :

०२२ – ६७८७ ६३ ४५ ह्या क्रमांकावर फोन करा. तुमचा नंबर मुद्रित केला जाईल व संयोजकांच्या सोयीनुसार माहिती देण्यासाठी ते तुम्हाला फोन करतील.

(टाइम्स ऑफ इंडिया, १५ ऑगस्ट, ०९ च्या पुणे आवृत्तीवरून)

वाचकांना आवाहन

जनसंवादच्या दिवाळी विशेषांकांच्या माध्यमातून आयोजित केलेल्या राज्यव्यापी स्पर्धेला आर्थिक मदत करून आपण हा 'देण्याचा सप्ताह' कृतीत आणावा. साहाय्याचा धनादेश 'ग्रंथाली–जनसंवाद' ह्या नावाने काढून 'रुची'च्या पत्त्यावर पाठवावा. – अध्यक्ष– जनसंवाद

या अंकापासून 'रुची' मासिकाची वार्षिक वर्गणी १०० रुपये करण्यात येत आहे. संस्थांना आणि व्यक्तींना वर्गणी सारखीच राहील.

वन फॉर सॉरो

ग्रंथाली

आगामी प्रकाशन

अनुराधा कुलकर्णी

हे पुस्तक म्हणजे लेखिकेच्या आंतरिक ऊर्मीचा प्रांजळ आविष्कार आहे. या लेखनाला एका लष्करी उच्चपदस्थ अधिकाऱ्याच्या पत्नीच्या अनुभवांची पार्श्वभूमी आहे. यातून लेखिका समाज–शासन यांना काही विचारू पाहते, काही सांगू पाहते, काही मोकळे करू पाहते. हे सारे मनोगत ललित लेखांच्या अंगाने उतरलेले असले, तरी त्याला वास्तवाची कुठे रुपेरी, कुठे चंदेरी तर काही ठिकाणी कडवट, झोंबणारी, टोकेरी झालरसुद्धा आहे. मात्र त्याला सत्य, शिव, सौंदर्याचे उपजत अधिष्ठान लाभलेले आढळेल. साहित्याचा विशुद्ध उद्‌गार म्हणजे तरी दुसरे काय असते? अनुराधा कुलकर्णींचा हा शब्दरूपी उद्‌गार विशुद्ध आहे, त्याला आपोआपच साहित्याचा स्पर्श लाभलेला आहे. – मधु मंगेश कर्णिक

'महाराष्ट्राचा लेखाजोखा' आणि 'डायरी' म्हणजे माहितीचा खजिना

– सुशीलकुमार शिंदे

'ग्रंथाली'ने प्रसिद्ध केलेल्या 'महाराष्ट्राचा लेखाजोखा' आणि 'डायरी' या पत्रकारांच्या लिखाणातून विकसित झालेल्या दोन पुस्तकांचे प्रकाशन केंद्रीय ऊर्जामंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्ते २१ ऑगस्टला विलेपार्ले येथील लोकमान्य सेवासंघात झाले. लोकमान्य सेवा संघाच्या श्री. वा. फाटक ग्रंथसंग्रहालयाच्या सहकार्याने झालेल्या या सोहळ्यास कुमार केतकर व अरुण साधू अन्य वक्ते म्हणून उपस्थित होते. अनेक ज्येष्ठ पत्रकारांचा याप्रसंगी नावाने उल्लेख करून, आपले व्यक्तिमत्त्व आणि नेतृत्व विकसित होण्यात वृत्तपत्रसृष्टीचा मोलाचा सहभाग असल्याचे शिंदे यांनी आवर्जून सांगितले. वृत्तपत्रसृष्टी आणि सत्ताधारी यांच्या नातेसंबंधांचा हा अनोखा पैलू मोठ्या मनोरम स्वरूपात लोकांसमोर आला. 'साप-विंचू' म्हणून पत्रकारांना टाळणारे राजकारणी थोडेच असतात. राजकारणी आणि पत्रकार एकमेकां-शिवाय राहूच शकत नाहीत याचाही प्रत्यय या समारंभातून आला.

'लेखाजोखा'मध्ये वसंत वासुदेव देशपांडे, मधू शेट्ये, दि.बा. खाडे, नीला उपाध्ये, प्रल्हाद नाईक, वसंत नाईक, ल.त्र्यं. जोशी, बा.न. मग्गीरवार, वसंत उपाध्ये आणि नीळकंठ खाडीलकर या पत्रकारांचे आठवणींवर आधारित लेख आहेत. याखेरीज, वसंत खेर आणि प्रभाकर शाण्डिल्य या मुख्यमंत्र्यांच्या प्रसिद्धी अधिकाऱ्यांचे लेखही समाविष्ट करण्यात आले आहेत. या पुस्तकास अरुण साधू यांची प्रस्तावना आहे. 'लोकसत्ता' नागपूर आवृत्तीचे निवासी संपादक प्रवीण बर्दापूरकर यांच्या अनुभवांनी 'डायरी' हे पुस्तक सजले आहे. त्यास कुमार केतकर यांची प्रस्तावना आहे.

या सर्व पत्रकारांचा आणि त्यांचा योगदानाचा अल्पपरिचय 'महाराष्ट्राचा लेखाजोखा' पुस्तकाचे संकलन करणाऱ्या दिलीप चावरे यांनी करून दिल्यानंतर राजकीय वृत्तसंकलनातील पहिल्या महिला वार्ताहर नीला उपाध्ये यांनी आपल्या काही आठवणी सांगितल्या. मधू शेट्ये १९४५ च्या सुमारास सार्वजनिक जीवनात प्रवेश करते झाले. गेल्या अर्धशतकाचा धांडोळा त्यांनी घेतला आणि बदलत्या वातावरणात पत्रकारांची जबाबदारी वाढल्याची जाणीव करून दिली.

या सोहळ्याला 'लोकसत्ता'चे संपादक कुमार केतकर यांनी वेगळीच वैचारिक उंची आणली. ते म्हणाले, महाराष्ट्राबद्दल मुक्तचिंतन करताना दिसते, मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र मिळाला, परंतु जशी मुंबईला स्वत:ची मानसिकता दिसते तशी महाराष्ट्राला एकसंध सामाजिक-सांस्कृतिक मानसिकता किंवा विचारप्रणाली दिसत नाही. याचे एक कारण म्हणजे मुंबईचे काही प्रमाणात नेहरू विचारप्रणालीशी असलेले, भविष्याचा वेध घेण्याचे भान हे आहे. भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचा प्रयत्न सशक्त आणि डोळस समाज बनवण्याचा होता. यशवंतराव चव्हाण केंद्रात संरक्षणमंत्रिपद स्वीकारण्यासाठी गेल्यानंतर महाराष्ट्रात त्या क्षमतेचा नेता तयार झाला नाही. तेव्हापासून महाराष्ट्राची बौद्धिक अधोगती चालूच आहे, असे विश्लेषण केतकर यांनी केले.

मुंबई आणि महाराष्ट्राचे भावसंबंध उलगडून दाखवताना केतकर यांनी शिवसेनेचा उल्लेख वैचारिक वाळवंट तर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा उल्लेख उपवाळवंट असा केला. महाराष्ट्राने सतत नेहरूवादास विरोध केल्यामुळेच राज्याची पीछेहाट झाल्याचे त्यांनी सांगितले.

केंद्रीय ऊर्जामंत्री सुशीलकुमार शिंदे भाषणाच्या सुरुवातीस काहीसे भावुक झाले होते. त्यांची राजकीय कारकीर्द १९७२-७४ या काळात सुरू झाली. त्यावेळी ऐन भरात असणारे मधू शेट्ये, दि.बा. खाडे, वसंत देशपांडे, वसंत नाईक आदी वार्ताहर समोर बसलेले पाहून शिंदे तेव्हाच्या आठवणींमध्ये हरवून गेले. शिंदे यांचे अनेक पत्रकारांबरोबर वैयक्तिक मैत्रीचे संबंध आहेत. त्यांनाही याप्रसंगी उजाळा मिळाला.

सोलापूर न्यायालयात बालशिपायाची नोकरी करणारे शिंदे मंत्री झाल्यानंतर 'स्टुलावरून खुर्चीवर' अशी बातमी देणारे राधाकृष्ण नार्वेकर समोरच होते. या बातमीचा विसर आपल्याला आजही पडलेला नाही, याची खास नोंद शिंदे यांनी घेतली.

सर्वसाधारणपणे मोठे पुढारी प्रकाशित करायच्या पुस्तकाबद्दल न बोलता आपणास पाहिजे असलेल्या विषयावरच बोलतात. मात्र शिंदे यांनी दोन्ही पुस्तके वाचल्याचे क्षणोक्षणी जाणवत होते. बर्दापूरकरांचे बालपण किंवा आपल्या आईचे त्यांनी केलेले वर्णन या बाबतचे दाखले त्यांनी दिले तेव्हा श्रोते थक्क झाले.

'महाराष्ट्राचा लेखाजोखा' म्हणजे गेल्या पन्नास वर्षांतील वाटचालीचा आलेख असल्याचे सांगून शिंदे म्हणाले, की राज्यशास्त्राच्या अभ्यासकांना मार्गदर्शक म्हणूनही अशी पुस्तके उपयुक्त असतात.

केतकर यांच्या भाषणाचा संदर्भ घेऊन शिंदे म्हणाले, की विविध विचारधारांचा

समन्वय केल्यानेच महाराष्ट्रात काँग्रेस पक्ष सत्तेवर राहिला आहे. महाराष्ट्र कोणत्याही एका 'इझम'च्या आहारी गेला नाही. सर्वसमावेशक राहिल्यानेच काँग्रेस लोकांबरोबर राहिली, असे मत त्यांनी मांडले. गेल्या पन्नास वर्षांतील सामाजिक परिवर्तनाचा संक्षिप्त आढावाही त्यांनी घेतला. महाराष्ट्राच्या आगामी पन्नास वर्षांच्या वाटचालीत जात हा घटक नाहीसा व्हावा, अशी अपेक्षा शिंदे यांनी व्यक्त केली.

आपल्या मनातील व्यथा मांडताना प्रवीण बर्दापूरकर यांनी शेतकऱ्यांच्या हलाखीचे वर्णन केले त्याने श्रोत्यांना अंतर्मुख बनवले. यासंदर्भात त्यांनी तीन हृदयद्रावक घटनांचा उल्लेख केला. वृत्तपत्र व्यवसायात काम करून संवेदनशीलता नष्ट होते, असा सर्वसाधारण अनुभव असतो. समोरच्या घटनेचे त्रयस्थ आणि वस्तुनिष्ठ वर्णन करताना वार्ताहराने आपल्या भावनांना आवर घालायचा असतो. अपघात, दंगली, हत्याकांड, आत्महत्या, साथींचे थैमान, महापूर आदींसारख्या घटनांचे वृत्तसंकलन वार्ताहराला नियमितपणे करावे लागते. त्यामुळे त्याच्यातील सर्जनशीलता संपून जाते. मात्र बर्दापूरकर यांनी या समजाला छेद दिला. त्याचा परामर्श शिंदे आणि केतकर या दोघांनी घेतला.

केतकर यांचे मुक्तचिंतन आणि त्यास शिंदे यांनी दिलेला प्रतिसाद ऐकताना श्रोत्यांना एक बौद्धिक मेजवानी मिळत असल्याचा अनुभव येत होता. 'विचारवंत संपादक' ही जमात नाहीशी होत असल्याची खंत अनेकजण आळवताना आढळतात. केतकरांच्या भाषणाने ती अस्थानी असल्याचे स्पष्ट झाले.

महाराष्ट्राच्या निर्मितीला पन्नास वर्षे पूर्ण होणार आहेत. या अर्धशतकाकडे वृत्तपत्रसृष्टी कशी पाहते, या भूमिकेतून 'महाराष्ट्राचा लेखाजोखा' या पुस्तकाची कल्पना निघाली. त्यातून प्रेरणा घेऊन ठिकठिकाणी आणि वेगवेगळ्या क्षेत्रांतील नामवंतांनी असे दस्तऐवज तयार करावे, असा सूर प्रकाशनाच्या कार्यक्रमानंतर अनेक वाचकांनी काढला.

– प्रतिनिधी

ग्रंथात्मी

डायरी

प्रवीण बर्दापूरकर

मूल्य १८० रुपये
१२० सवलतीत रुपये
घरपोच १३० रुपये

प्रवीण बर्दापूरकरांनी गेल्या तीस वर्षांत अनेक सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय उलथापालथी पाहिल्या आहेत. हा काळच प्रचंड उलथापालथींचा आहे. त्यातील अनेक नायक–खलनायक वा प्रतिनायक–उपनायक प्रवीणना भेटले आहेत.

प्रवीण यांनी त्यांच्या त्या प्रवासाची मानसिक नोंद केली आहे आणि अर्वाचीन इतिहासात त्यांचे कोंदण कोणते ते ठरवून ती 'जागा' त्यांना दिली आहे. विशेष म्हणजे, प्रवीणच्या डायरीत आत्मप्रौढी नाही वा आत्मकरुणा नाही, आत्मवंचना नाही आणि कुठचा गंडही नाही. यामुळे त्या लेखनाला एक सहजता, एक तात्कालिक–ऐतिहासिकता आणि एक प्रवाहीपणा प्राप्त झाला आहे.

ही 'डायरी' प्रत्येक 'होतकरू' पत्रकाराने वाचावीच, पण तिचा परिसर पत्रकारितेच्या पलीकडे, म्हणजे आपल्या व्यापक सामाजिक–राजकीयतेकडे आहे आणि म्हणूनच सर्वच प्रकारच्या वाचकांच्या मनोकक्षा रुंदावणारा आहे.

– कुमार केतकर

महाराष्ट्राचा लेखाजोखा

संकलन : दिलीप चावरे

मूल्य १६० रुपये
सवलतीत १०० रुपये
घरपोच १२० रुपये

प्रत्येक पत्रकाराचे वेगळे वैशिष्ट्य, दृष्टिकोन वेगळा, लिहिण्याची पद्धत वेगळी. आवडी–निवडी वेगळ्या. त्यामुळे गेल्या पन्नास वर्षांच्या महाराष्ट्रावर अनेक बाजूंनी प्रकाश पडल्यासारखा वाटतो. उगवत्या पत्रकारांनी जरूर वाचावे असे हे पुस्तक.

– अरुण साधू

सौदीच्या अंतरंगात

श्रीरंग कुळकर्णी

दिनांक १२ ऑगस्ट. गळा किंवा खिसा कापणाऱ्या 'स्वाईन फ्लू'ने भारतात दौरा केला होता. तेव्हा सरकारने सात दिवस शाळा-महाविद्यालयांना सुट्टी घोषित केली. रात्री मी वडिलांच्या बॅगेपाशी 'सौदीच्या अंतरंगात' हे पद्मा कऱ्हाडेंचे पुस्तक पाहिले. आई-वडिलांनी झोपण्याचा आग्रह केला म्हणून मी झोपलो तेव्हाही विचार होते ते याच पुस्तकाचे.

सकाळी आईबाबांनी कामावर जाताना बजावले 'अभ्यास कर हं!'

दरवाजा बंद झाल्याचा आवाज आला आणि मी पुस्तक हातात घेऊन मुखपृष्ठावरील खजुरासारख्या मधुर रसाळ भाषेचा आस्वाद घेऊ लागलो. हे तर, गोपिकांची वा घरातील वडील माणसांची पाठ असताना वा लक्ष नसताना श्रीकृष्ण दूध, लोणी, दही चाखायचा तसेच झाले.

खरे तर, माझ्याकडे आंतरजालावर (इंटरनेटवर) तासन्तास रुळणे, एमटीव्ही, व्हीटीव्ही सारख्या वाहिन्यांवर गाणी ऐकणे, पेटी वा कॅसियो वाजवणे किंवा अन्य पर्याय उपलब्ध होते, पण काळ्या सोन्याची खाण असलेल्या, शिस्तबद्ध परंपरा जपणाऱ्या देशावरच्या पुस्तकाने माझ्या मनाला घोरपडीच्या पकडीप्रमाणे पकडले. दीड दिवसात पुस्तक वाचले आणि जणू सौदी फिरून आल्याचा भास झाला! वाचताना लेखिकेचे बरेच गुण कळत होते. संबंध टिकवण्यासाठी असलेली आस्था, नवीन संबंध वा मैत्री करण्याची आवड हे ठळक मुद्दे 'माझा सौदीचा मुक्काम' यात दिसतात. लेखिका कशी बदलत होती हे मुख्यतः जाणवते. 'जीवनाची झलक' या पाठात लेखिकेने बारीक किंवा अतिसूक्ष्म व अविभाज्य गोष्टींचा विचार मांडला आहे. उदा. बागा, रस्त्यांचे सुशोभीकरण, सुपर-मार्केट, पेट्रोलपंप येथील दिवे सजावट इत्यादी.

स्त्रिया वा पुरुषांना पाळावे लागणारे कडक नियम किंवा न पाळल्यास होणारी सजा इत्यादी गोष्टी नमूद केल्या आहेत. ही कल्पना भारतात रुजली पाहिजे असे मला वाटते.

एके ठिकाणी आहे की ऑटोमोबाईल व टेक्नॉलॉजीच्या बाबतीत सौदी भारताच्या १० वर्षे मागे आहे असे तेथील भारतीय चेहरे सांगतात. पण पुढील भागात वाचत जावे तसे सौदी या बाबतीत प्रगत असल्याचे कळते. उदा. सौदीच्या ट्रक्समध्ये एक्झॉस्ट पाईप वर असतो व त्याने प्रदूषण होत नाही, तर आपल्याकडे हा पाईप खाली असल्याने ट्रॅफिकमध्ये ऑक्सिजनपेक्षा हाच वायू शरीरात येतो. दुसरे उदाहरण म्हणजे, आपलीच नवी ओळखमध्ये लेखिका तिच्या डॉक्टर मैत्रिणीकडे जाते तेव्हा मैत्रिणीने हॉस्पिटल दाखवते. तिथली स्वच्छता सर्व डिपार्टमेंट्स, सर्व सुविधा, अद्ययावत मशिनरी हे पाहून लेखिकेला छान वाटतं. भारतातील हॉस्पिटलांत जागेवर कोणी नसतो, स्वच्छता कमी असते, त्यातून अद्ययावत सेवा सुविधांचा अभाव असतो. येथील डॉक्टर आजही ब्लडप्रेशर हाताने हवेचा दाब देऊन तपासतो. इलेक्ट्रॉनिक सुविधा कमी प्रमाणात आढळते. मग सौदी दहा वर्षे मागे कसा, हा प्रश्न पडतो.

'आधुनिक काळातील यम' हा मुद्दा पुस्तकात सर्वोत्कृष्ट वाटला. लेखिकेने महंमद सरद् अल् बेशी व त्याच्या कार्याचे वर्णन उत्कृष्ट केले आहे. बेशी हे गृहस्थ शिक्षा देण्याचे काम करतात. या भयानक शिक्षांचे प्रकार ऐकताच तेथील लोक गैरकृत्य करण्यास पाय मागे खेचत असतील. बेशी यांना मृत्योत्तर जीवनात पुण्य मिळेल. कारण गुन्हेगारांना शिक्षा देऊन समाजात सुव्यवस्था ठेवतात.

कॅमेरा, फोन्स यांवर बंदी आहे हे एक उत्तम नियोजन आहे. कॅमेरा फोनचा मुद्दा लेखिकेने उत्तम व स्पष्ट मांडला आहे.

रमादानाविषयीची माहिती अप्रतिम मांडली आहे. ही वाचताना सर्व डोळ्यांसमोर येते. रमादानातली मजा, कैद्यांच्या सजातील मजा, लोकांचा आहार, कडक उपवास हे वाचताना २१व्या शतकातही धार्मिक कर्तव्ये तंतोतंत पाळणारा समाज दिसतो.

डोळ्यात पाणी येतं ते स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचारांशी संबंधित लेख वाचताना स्त्रियांवर अत्याचार झाला की मुले मोठेपणी मनात राग ठेवून गैरप्रकार करत नसतील का? तो कोणता असेल (दहशतवाद, सामान्य गुन्हे, खून, मारामाऱ्या) किंवा त्यांची मने पुरात मुळाचा आधार जाऊन कोलमडलेल्या वृक्षाप्रमाणे होत असतील, असे वाटते.

सत्ता मिळवण्यासाठी व ती टिकवण्या-साठी राज्यकर्ते- मग ते लोकशाहीतील असोत वा राजेशाहीतील- आधुनिकतेपासून जनतेला दूर ठेवतात. प्रलोभन दाखवतात, पण सौदीतील प्रिन्स तलाल या राजकुमार व उद्योजकाची मुलाखत वाचताना, आजच्या राज्यकर्त्यांची भूमिका अशीही असते याचे दर्शन घडते.

सौदी ह्या देशाच्या अंतरंगात इंधने आहेत. त्यांना जगातून मागणी आहे. ती मौल्यवान आहेत. तसेच या पुस्तकातही मौल्यवान मुद्दे, लिखाण, कथा आहेत व या अप्रतिम पुस्तकाची सौदीतील इंधनाच्या मागणीप्रमाणेच मागणी वाढावी.

– श्रीरंग कुळकर्णी
एफ.वाय.जे.सी. (विज्ञान)
निर्मला मेमोरियल फाउंडेशन कॉलेज
ई-मेल : shreekhand.puri@gmail.com

‘मंडालेचा राजबंदी’ आणि मी

अरविंद व्यं. गोखले



माझे आजोबा आमच्याकडून लहानपणी पाढे, परवचा याबरोबरच श्लोक, आर्या असं बरंच काही पाठ करून घेत असत. आम्ही भावंडं त्यांच्यासमोर बसून हे सारं पाठांतर करत असू. ‘केल्याने होत आहे रे आधी केलेचि पाहिजे’, ही उक्ती त्यापैकीच एक. ‘प्रयत्ने वाळूचे कण रगडिता तेलही गळे,’ असे म्हणून त्यांचे हे प्रयत्न चालूच असत. त्यांनी आणि माझ्या वडिलांनी आपल्या कोशात ‘नाही’ हा शब्द असता कामा नये, असं आम्हाला बजावलं होतं. स्वाभाविक मी कुणालाही ‘नाही’ म्हटल्याचं मला आठवत नाही. वृत्तपत्रीय कारकिर्दीकड माझी पावलं वळली, यालाही बहुधा माझा हाच ‘भिडस्त’ स्वभाव कारणीभूत ठरला असावा. असो, तो या लेखाचा विषय नाही, अन्यथा सांगण्यासारखं आणि न सांगण्यासारखं बरंच काही आहे, पण ते पुन्हा केव्हातरी!

‘मंडालेचा राजबंदी’ हे मोठं जाडजूड पुस्तक माझ्या हातानं लिहून होईल, असं मला आठ वर्षांपूर्वी कुणी सांगितलं असतं तर मी त्यालाच काय, मलाही मुर्खात काढलं असतं. सांगायचा मुद्दा हा, की ‘मंडालेचा राजबंदी’ हे पुस्तक लिहायला घेतलं त्याला आठ वर्षं तरी नक्कीच झाली. तसं हे शिवधनुष्य होतं आणि ते अंगावर पडलं असतं तर भलतंच काही घडलं असतं. हे पुस्तक राजहंस प्रकाशनाचे दिलीप माजगावकर यांच्या चिकाटीचं फळ आहे. तेव्हा मी ‘केसरी’चा बारावा संपादक होतो. महाराष्ट्रातच काय, पण साऱ्या जगात संपादक मोजायची अशी पद्धत नाही. काही वृत्तपत्रांत वीस वर्षांमध्ये ४० संपादक झाल्यानंही असेल संपादक मोजले जात नाहीत! ‘केसरी’ हा अपवाद, कारण टिळक-आगरकर यांचं हे वृत्तपत्र. आगरकर हे पहिले तर मी बारावा. अर्थात मी त्यांच्यापैकी कुणाच्याही रांगेत बसणारा नाही.

लोकमान्यांच्या मंडालेच्या काळ्यापाण्याच्या शिक्षेवर लिहायचं माजगावकरांनी सुचवलं, त्याला कारण मंडालेच्या शिक्षेची शताब्दी २००८ मध्ये येणार होती आणि त्याआधी आठ वर्षं त्यांनी माझ्याकडे लिखाणाबद्दल आग्रह धरला होता. हे लिखाण मंडालेच्या शिक्षेच्या सहा वर्षांपुरते मर्यादित ठेवून चालणार नव्हते. त्यांना झालेली राजद्रोहाची पहिली शिक्षा, त्याआधी देशभर पसरलेला दुष्काळ, पुण्यात पसरलेली प्लेगची साथ, या साथीत पुण्यात स्त्रियांना उघड्यावर उघडे करून तपासायचा चाललेला आघोरी प्रकार, इंग्रज सोजिरांनी केलेले अत्याचार, रँडचा चापेकरबंधूंनी केलेला खून, दुष्काळ व टिळकांनी ‘फेमिन कोडा’चे भाषांतर करून सामान्य शेतकऱ्यांपर्यंत त्याचं केलेलं वाटप, टिळकांवर इंग्रजांचा संशय, न्यायमूर्ती रानडे यांच्यासारख्यांनी जामिनास दिलेला नकार, पहिल्या खटल्याच्या वेळी टिळकांना हातात बेड्या घालून रस्त्यानं घेऊन जायचा बेशरमपणा, असं बरंच काही लिहिताना समोर आलेले मुद्दे मी तपासत गेलो. मग बंगालमध्ये उडालेले बॉम्ब, खुदीराम बोसनं केनेडी मायलेकींचे केलेले खून आणि इंग्रज माजल्यासारखे वागत राहिले तर स्फोट होत राहणारच, असं टिळकांनी इंग्रजांना ठणकावून टाकलं तो अग्रलेख... असं एकामागून एक पान उलगडत गेलं. मुझफ्फरपूरचे बॉम्ब फुटण्यापूर्वी सुरतेच्या काँग्रेसमध्ये टिळकांचं दिसलेलं धीरोदात्त रूप मला प्रेरणा देत गेलं. पुढे माझी भावनिक गुंतवणूक एवढी वाढली, की इंग्रजी-मराठी संदर्भ माझ्यापुढे हात जोडून उभे राहायला लागले. ‘मला घ्या’ असं ते म्हणत आणि लोकमान्य टिळक आणि त्यांचे नातू जयंतराव मला पहाटे उठवून कुठपर्यंत आलं लिखाण असं विचारू लागले. (जयंतराव त्या काळात हयात नव्हते.) यात एका अक्षरानंही खोटेपणा नाही. जयंतराव हे तर माझ्यावर अतिशय माया करणारे माझे संपादक. या पुस्तकाच्या लेखनाला होत घालण्यापूर्वी ते गेले. माझा एक आधार तुटला.

मी २००५ पर्यंत लोकमान्यांविषयी जेवढी म्हणून पुस्तकं मिळवता येतील तेवढी विकत घेतली. एका बाजूला या पुस्तकांमधल्या महत्त्वाच्या भागांची टिपणं काढू लागलो. याच सुमारास केसरीच्या ग्रंथालयात जाऊन मी त्या काळातल्या अंकांवर नजर टाकू लागलो. एक स्वतंत्र वही करून त्यात नोंदी केल्या. लोकमान्यांचे सर्व अग्रलेख बारकाईनं वाचता आले. ‘समग्र टिळक’ या आठ खंडांना अभ्यासल्यानंतरही बऱ्याच गोष्टी ‘केसरी’च्या त्या काळातल्या अंकांमध्ये दिसू लागल्या. तो काळ डोळ्यांसमोर स्वच्छ येऊ लागला. त्या वर्षांमध्ये दुष्काळ किती भयानक होता त्याचं दर्शन घडू लागलं. मुळशी पेट्याचं

वार्तापत्र तर खूपच बोलकं होतं. ल. रा. पांगारकर यांनी लिहिलेल्या एका वार्तापत्रात मुळशीच्या जनतेवर ताडाच्या झाडांचे बुंधे कापून, त्याचे पीठ पाण्यात कालवून खाण्याची वेळ आल्याचं म्हटलं होतं.

टिळक-गोखले, टिळक-रानडे यांच्यातले मतभेदांचे मुद्दे स्पष्ट होत गेले. 'देशाचे दुर्दैव' हा टिळकांनी १२ मे १९०८ रोजी केसरीत प्रसिद्ध केलेला अग्रलेख त्यांच्या काळ्या पाण्याच्या शिक्षेला कारणीभूत ठरला. या खटल्यात त्यांना जामीन मिळावा यासाठी बॅरिस्टर महंमद अली जीना यांनी आपलं वकिली कसब पणाला लावलं होतं. दिनशा दावर हे न्यायमूर्ती, तर जामिनकीच्या अर्जावर युक्तिवाद करणाऱ्या जीनांसमवेत दावर यांचे चिरंजीव त्यांच्यासमोर टिळकांच्या बाजूनं वडिलांविरुद्ध मुलगा असं न्यायालयीन चित्र इतिहासात फार थोड्या ठिकाणी पाहायला मिळतं. प्रत्यक्ष खटला उभा राहिला तेव्हा मात्र टिळकांनी स्वतःच युक्तिवाद केला. या युक्तिवादातून टिळकांना इंग्रजांचं कपट-कारस्थान, त्यांची जुलूमशाही यांना जनतेच्या दरबारात उभं करायचं होतं. आपल्यावरल्या राजद्रोहाच्या खटल्याचा इंग्रजांविरुद्धच्या प्रचारासाठी हातभार कसा लागेल, हे टिळकांना पाहायचं होतं. त्यासाठी रोज प्रसिद्ध होऊ शकणारा केसरी हवा होता, तोही मुंबईतून. त्यांनी त्यासाठी एक छापखानाही पाहिला होता. तथापि टिळक तुरुंगात आणि तेव्हा व्यवहारदक्षतेची अशी व्यवस्था नव्हती. टिळकांचे अनुयायी गंगाधरराव देशपांडे यांनी कवी केशवसुतांचे बंधू सी.के. दामले संपादक असलेल्या 'राष्ट्रमत' दैनिकांशी चर्चा केली आणि दामले यांनी टिळकांचा हा राष्ट्रद्रोहाचा खटला रोजच्या रोज प्रसिद्ध करायची तयारी दाखवली. जेणेकरून जनमत जागृत व्हावं, यासाठीची ही योजना होती. ती फलद्रुप झाली. टिळकांना सहा वर्षांच्या काळ्यापाण्याची शिक्षा दिली जाताच; मुंबईत वर्षाला एक दिवस या न्यायानं सलग सहा दिवसांचा संप गिरणी कामगारांनी पुकारला आणि त्याला मुंबईत शंभर टक्के प्रतिसाद मिळाला. लेनिनलाही चकित करणारा असा हा संप होता.

२२ जुलै १९०८ च्या रात्री टिळकांना शिक्षा सुनावण्यात आल्यानंतर रात्रीच्या गाडीनं टिळकांचे सहकारी कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर पुण्यात आले. गायकवाड वाड्याच्या दिंडीपाशी बसून ते ढसाढसा रडू लागले. गायकवाड वाड्यावर पडलेली ती कृष्णछाया होती. गायकवाड वाड्याच्या दारवानानं खाडिलकर यांना पाहिलं आणि टिळकांच्या घरी नेलं. खाडिलकर यांची टिळकांवर असणारी अनन्यसाधारण निष्ठा लक्षात घेता या दृश्यानं आपल्यालाही गलबलून येतं. खाडिलकर टिळकांच्या घरी गेले. आतल्या दारातून सत्यभामाबाई आल्या आणि म्हणाल्या, 'अहो खाडिलकर, असे रडता काय? त्यांनी काही चोरी केली नाही, छिनाली केली नाही. त्यांना झालेली शिक्षा राजद्रोहाबद्दल आहे, मग तुम्ही रडता काय? सत्यभामा बाईंचं हे धीरोदात्त रूप मला दिसलं. टिळकांच्या या पत्नीविषयी स्वतंत्र पुस्तक लिहिता येईल, असं त्यांचं रूप खणखणीत आहे. तेवढी कागदपत्रं मिळाली, तर एका पुरुषसिंहामागे ठाम राहिलेल्या पत्नीचा चेहरा समाजाला कळेल.

टिळक हे अनेक पैलूंनी व्याप्त असं व्यक्तिमत्त्व. 'मंडालेचा राजबंदी' या पुस्तकाच्या निमित्तानं हे पैलू मला पाहायला मिळाले. अनेक तऱ्हेचं लेखन अनुभवता आलं. टिळकांची मुलांवर असणारी माया, पत्नीच्या निधनानंतर व्याकुळतेनं मुलांना मंडालेतून 'आता तुम्हीच तुम्हाला जपले पाहिजे' म्हणून बजावणारे टिळक, माफी मागून तुरुंगातून सुटण्यापेक्षा मरण पत्करणं श्रेयस्कर असं सांगणारे टिळक आणि आपल्या वृत्तपत्राला छापून द्यायला नकार देणाऱ्या 'आर्यभूषण'मधून निघणाऱ्या प्रतिस्पर्धी 'ज्ञानप्रकाश'साठी स्वतःवरच टीका करणारा अग्रलेख लिहून देणारे टिळक अशा रूपांना साकारताना मी मोहरून जात असे. आपल्याला मिळालेली ही सर्वात मोठी संधी आहे, असं मानून मी लिहीत गेलो. लिहायला बसलो, तसे नवनवे विचार सुचले. उत्तम पुस्तकं मिळत गेली, कागदोपत्री पुरावा मिळाला. या लेखनकाळातच एक योगायोग घडून आला. २००७ च्या दिवाळीत मुंबईचे माझे स्नेही आणि 'श्री सद्गुरू साईकृपा' या दिवाळी अंकाचे संपादक बाळ जाधव यांनी एक सनसनाटी बातमी सांगावी, तशी एक गोष्ट सांगितली. त्यांचे एक दोस्त-कल्याणचे दत्ता जोशी यांच्याकडे टिळकांच्या हस्ताक्षरातले मृत्युपत्र आहे असं त्यांनी सांगितलं! माझी उत्कंठा वाढली. एके दिवशी दत्ता जोशी ते मृत्युपत्र घेऊन पुण्याला आले. मंडालेला प्लेगची साथ पसरल्यानं टिळकांना मिकटिला येथील तुरुंगात ठेवण्यात आलं होतं. आपण आता या तुरुंगातच मृत्यूला सामोरे जाणार, असं वाटून टिळकांनी तिथे हे मृत्युपत्र केलं. ते दाजी आबाजी खरे या वकील आणि टिळकस्नेह्यांमार्फत कोकणात पोचलं. खरे हे दापोली जवळचे आणि त्याच परिसरात दत्ता जोशी यांचे वाडवडील राहायचे. कदाचित, ते खरे यांचे परिचित असतील. मिकटिलाच्या या मृत्युपत्रात असणारा तपशील थक्क करून सोडणारा आहे. रायगडावर असणाऱ्या शिवस्मारकासाठी पंचवीस हजार रुपयांची तरतूद करायला टिळक त्याही स्थितीत विसरलेले नाहीत.

मंडाले आणि मी असा हा प्रवास अतिशय सुखसम झाला, हे माझं भाग्य. बऱ्याच गोष्टी घडून आल्या. अनेक दस्तावेज माझ्यापर्यंत चालत आले. असंख्य पुस्तकांचं वाचन आणि केसरी-मराठा ग्रंथशाळेनं उपलब्ध करून दिलेल्या फायली, यातून 'मंडालेचा राजबंदी' परिपूर्ण झालं एवढं मोठं पुस्तक लिहू शकेन, असं मला वाटत नव्हतं, पण पुस्तक प्रकाशात आलं त्यामुळे मी तरी स्वतःला कृतकृत्य झाल्याचं समजतो. टिळकांनी हे पुस्तक माझ्या बोटाला धरून लिहवून घेतलं. मी तरी तसंच म्हणेन!

– अरविंद व्यं. गोखले
एन-४, निरंत वसाहत,
बिबवेवाडी, पुणे – ४११० ३७
फोन –०२०-२४२१७४६९
भ्रमणध्वनी-९८२२ ५५ ३० ७६

अज्ञाताचे विज्ञानपर्व

अरुण निगुडकर

भूगर्भशास्त्रानुसार रामायणाचा येणारा काळ ८००० ते ७३०० वर्षांपूर्वीचा आहे. हिमयुगाचा अस्त ११००० वर्षांपूर्वी झाला असे भूगर्भ व हवामान परीक्षणातून सिद्ध झाले आहे. सरस्वती ही सर्वांत प्राचीन नदी याच काळात हिमालयात उगम पावली. सर्व प्राचीन विद्याशास्त्रांचा उगम सरस्वती व सिंधू नद्यांच्या काठाकाठाने झाला. महाभारताचा काळ रामायणानंतर १००० ते १५०० वर्षांचा, तर सरस्वती नदी इसवी सनपूर्व १९०० मध्ये राजस्थानात लुप्त झाली. आज कालायत (हरयाना) या ठिकाणी तिला भारतीय शास्त्रज्ञांनी तिच्या जमिनीखालील गुप्त ठिकाणाहून प्रकट होण्यास भाग पाडले आहे.

आर्यावर्त म्हणजे भारतवर्ष वा जंम्बुद्वीपात जी संस्कृती उगम पावली ती जगातील आद्य विज्ञानसंस्कृती आहे असे आजचे भारतीय विज्ञान सांगते आहे. त्यामुळे प्राश्चत्यांनी आमच्याविषयी निर्माण केलेले इतिहासाचे संशोधनात्मक गैरसमज आम्ही नव्याने पारखून घेणे गरजेचे आहे.

इतिहासाचा हा एक नवा टप्पा किंवा नवा विचार म्हणा हवे तर, पण तो आवश्यक आहे. किती दिवस आम्ही पराभूत दृष्टीने आम्हाला पाश्चात्यांहून कमी दर्जाचे मानणार का? आमची विज्ञाने प्रामुख्याने भूगोल-टोपोग्राफिक व अंतराळ सर्वेक्षणे प्राचीन भारताचे जे स्वरूप- छायाचित्रे, त्रिमिती कंम्प्यूटर सर्वेक्षण व संकलनातून नासा व इस्रो दाखवत आहेत त्यावरून आम्हाला रामायण, महाभारत, पुराणे यांचे संदर्भ एका बाजूने वेद, उपनिषदे, पुराणे व दुसऱ्या बाजूने इस्रो-जिऑलॉजी, आर्किऑलॉजी यांच्या परीक्षणांशी जुळवून घेणे गरजेचे आहे; कारण त्यात आमचा खरा इतिहास दडून बसला आहे. तो मुक्त करणे ही काळाची गरज आहे.

हजारो वर्षांपूर्वी विमानांची आकाशात घमासान लढाई झाली होती याचे पुरावे दक्षिण अमेरिकेत इन्का, मय, इजिप्तच्या पिरॅमिडमध्ये कोरल्या गेलेल्या विमानाच्या प्रतिकृतीनी दाखवले आहेत. रामाने रावण वा कुबेराचे पुष्पक विमान लंकेतून अयोध्येला ज्या मार्गाने नेले त्याचा डॉ. सुरेश भावे यांनी दाखवलेला मार्ग जगदमान्य झाला त्याला आज ३० वर्षे होऊन गेली. डॉ. मधुसूदन चान्सरकरानी रावणावर, प्रत्यक्ष लंकेत जाऊन, लंकेच्या पुरातत्व खात्याची मदत घेऊन, त्यांच्या आख्यायिका व श्रीलंकेने तयार केलेला नकाशा, रामायणातली अनेक वर्णने ही संशोधने, नासाने अलिकडे लंका शासनाच्या सहकार्याने केलेल्या संशोधनाशी कुठे जुळतात का हे भारताने जाणून घेतले पाहिजे. श्रीलंकेने मागच्या वर्षी रामायण खरे आहे व त्याचे संशोधन करण्यासाठी आपण मदत द्यायला तयार असल्याचे जाहीर केले होते. त्यांनी काही डॉक्युमेंटरीज तयार केल्या व काही परकीय चॅनल्सनी त्या दाखविल्याही. ती सर्वच माहिती खरी आहे असे मानण्याची आवश्यकता नाही, परंतु जर लंका वा नासा रामायणाच्या संदर्भात मदतीचा हात पुढे करत असतील तर भारताने सहकार्य करण्यासाठी पुढे येणे ही भारतीय इतिहासाची गरज आहे. रावणाला आपल्या दृष्टीसमोरून हकलून देण्याची भाषा वैज्ञानिक दृष्टिकोनातून कुठल्याही संशोधकाना मान्य होणारी नाही. कुठल्याही वैज्ञानिक संशोधनाला जात, धर्म, याबाबत स्वतःची पूर्वग्रहदूषित मते कायम ठेवून इतिहासाचे आकलन, लेखन करणे शक्य नाही. इतिहास म्हणजे होऊन गेलेल्या खऱ्या नोंदीचे संकलन. रावणाने पुलस्त्य (पुलस्ती), ऋषीकडून (आजोबा) ज्या विद्या शिकल्या त्याच विद्या देवांनाही पाहिजे होत्या. इंद्राने पुलस्त्याचा आमंत्रण देऊन सत्कार केला व महर्षी ही पदवी म्हणजे आजच्यासारखी डॉक्टरेट त्याला प्रदान केली. इंद्र हुषार होता. पुलस्त्य वा शुक्राचार्य हे राक्षसवंशीय ऋषी म्हणून का मान्य झाले? म्हणजेच देवांनी त्यांचे श्रेष्ठत्त्व का मान्य केले? आमचे धर्मग्रंथ तर हे सांगतात, की त्या विद्या देवांकडे नव्हत्या. दुसऱ्याकडे असलेली विज्ञाने मिळवण्यासाठी तो शत्रू असला तरी दादा-पुता करून ती मिळवली पाहिजेत हे तत्त्व त्यामागे आहे. म्हणूनच कच-देवयानीची कथा घडली.

राजकारणात व विज्ञानक्षेत्रात कोणी मित्र-शत्रू नसतो. आपल्याहून श्रेष्ठ पराक्रम व ज्ञान ज्याच्यापाशी आहे त्याच्याशी शत्रुत्त्व करू नये, झाले तरी ते मिटवावे हे रामायणातच सांगितले आहे. रावण विद्याश्रेष्ठ आहे व दशानन म्हणजे भारतातली १० राज्ये जिंकणारा, पण आपल्याहून वेगळ्या कुळातील कुशल तंत्रज्ञ आहे ही गोष्ट राम विसरू शकला नाही. रावणाजवळ पूल बांधण्याचे तंत्र नव्हते, जे वानरवंशीय नलाकडे होते. रामाकडे विमानविद्येत पारंगत माणसे व पुष्पक विमानाच्या तोडीची विमाने नव्हती. तशी विमाने गंधर्व व वानरांकडे होती. त्याआधी किष्किंधाचा राजा वाली याने त्याच्या उड्डाणास्त्रांच्या जोरावर रावणाचा पराभव केला होता.

नल आणि त्याचे वानर सेतू बांधत असता राक्षसानी रावणाजवळ तो तोडण्याची परवानगी मागितली. रावणाने स्पष्ट शब्दात ती नाकारली. असे का केले त्याने?

मृत्युशय्येवर पडलेल्या रावणाकडून लक्ष्मणाला ज्या अज्ञात विद्या शिकून घेण्यास रामाने सांगितल्या त्या होत्या तरी कुठल्या? व रावणानेही त्या लक्ष्मणाला अंत्यसमयी का दिल्या? हे रामायणातले सांगितलेले प्रसंग आहेत. राक्षससंस्कृती ही आर्यसंस्कृतीहून कनिष्ठ नव्हती. निश्चितपणे तुल्यबळ होती. रावणाजवळ टेलि कम्युनिकेशन सिस्टिम होती. रामाजवळ नव्हती. अंतराळ ते अंतराळ, अंतराळ ते जमीन, अंतराळ ते समुद्र यावरून जाणारी शत्रूयाने लक्ष्यापर्यंत पोचण्याआधीच नष्ट करणारी रडार यंत्रणा, दोन राक्षस सैनिकांना आपापसात संपर्क साधता यावा म्हणून कानात अडकावून ठेवता येणारी छोट्या वाटाण्यासारखी स्वरयंत्रणा त्याने वापरात आणली. त्याचा विपर्यास त्यांना मायावी पिशाच्च विद्यापारंगत म्हणून झाला.

रावणाचे पुष्पक विमान, सीतेच्या अपहरणाचा त्याचा प्रवासमार्ग धुंडाळून, तो मार्ग रोखून धरणारा पक्षीसम्राट जटायू मध्यप्रदेश- ओरिसा (असुरगड) महाराष्ट्राच्या आंध्रप्रदेशाला भिडलेल्या प्रदेशातील आदिवासी अशिक्षित असूनही स्वतःला रावणाचे वंशज समजतात ते का? त्यांना हे कुणी सांगितलं की सीतेच्या अपहरण काळात त्यांच्या भूप्रदेशावरून रावणाचे विमान (वा विमाने) उडत गेली व त्याने त्याच्या काही विश्वासू हेराना शत्रूने केलेल्या हालचालीची माहिती देण्यासाठी मागे ठेवले; त्यांचे ते वंशज आहेत. डॉ. सांकलियानी असुरगड ही रावणाची लंका असल्याचा सिद्धांत मांडला. तो नंतर बाद झाला हे खरे असले तरी भारतात जे राक्षसवंशीय म्हणवून घेणारे आदिवासी आहेत, त्यांचा संबंध आजच्या युगात कुठेतरी प्राचीन विमानविद्येशी निगडीत आहे.

चार वर्षांपूर्वी मी इजिप्तमध्ये गेलो होतो. कायरो म्युझियमने पुरवलेल्या गाइडने बोलताना रावणाचे नाव घेतल्याने मी उडालोच. तो म्हणाला, सम्राट खुफू (चिऑप्स, ग्रेट पिरॅमिड) लंकेहून मदिरा, हस्तिदंत व चंदन आयात करी व त्याबदली लांब धाग्याचा कापूस रावणाच्या प्रचंड जहाजात गासंड्याच्या स्वरूपात भरला जाई. डिस्कव्हरीने ग्रेट पिरॅमिड खाली सापडलेली छिन्नी, हातोडा, खिळे व पट्टीसारखी दिसणारी तांब्याची व तशा कुठल्यातरी धातूची हत्यारे दाखवली होती. खुफूला ग्रेट पिरॅमिड बांधण्यास रावणाने मदत केली हे कितपत खरे असू शकेल?

रावणाच्या ज्या अनेक विद्या सांगितल्या आहेत त्यांत अर्कशास्त्र म्हणजेच मदिरा व संगीतही आहे. रूद्रवीणेचा जनक म्हणून रावणाचे नाव घेतले जाते ते का? रावणाकडे असलेली विज्ञा जाणून घेण्याचा प्रयत्न इंद्राने केला, रामाने केला, वाल्मिकीनेही केला, मग आजच्या विज्ञानयुगात आम्ही का करू नये?

महाभारताचे लेखक अनेक असू शकतील, परंतु महाभारत हा एक प्राचीन भारताचा भौगोलिक इतिहास आहे हे निश्चित. आमच्या पूर्वजांनी कुठल्याही इतर संस्कृतीच्या अगोदर रशिया, चीन, तुर्कमेनिस्थान, इराण उझबेकिस्थान इत्यादी राष्ट्रांना भेटी दिल्या होत्या. पुढे रशियामार्गे त्यांनी अमेरिकेत पाऊल टाकले होते. या राष्ट्रांतील अनेक स्मृतिविशेष (Artefacts) तसे स्पष्टपणे दाखवतात. ख्रिश्चन राष्ट्रे वा युरपमध्ये तिथला समाज जगण्यासाठी वा प्राथमिक गरजांसाठी झगडत होता त्यावेळी आमच्या प्राचीन संस्कृतीतील समाज एका प्रगतिशील अवस्थेला पोचला होता.

विद्या, विज्ञान आणि प्रवास ही भारतीय समाजाची प्राचीन काळातली सहजावस्था राहिली होती हे महाभारत व त्या अगोदरची वैदिक संस्कृती सांगते. ज्ञान मिळवणे व त्यासाठी कुठेही जाणे हे आम्हाला तेव्हा कष्टदायक वाटले नाही. तेव्हाही समाजाची रचना गुणकर्मानुसार होत असे, परंतु आजच्यासारखी जाती-धर्म विभागणी तेव्हा झाली नव्हती.

महाभारत काळातली जनपदे ही आपोआप निर्माण झालेली छोटी राष्ट्रेच होती. त्यांचे वंश, भाषा वेगळ्या होत्या. तरीही शिक्षण, तीर्थाटन, समाजधुरणांबद्दल आदर ही वैदिक काळाची प्रेरणा राहिली. रामायण व महाभारत काळात हा सर्व समाजव्यवस्थेचा मूलस्रोत वा स्थायिभाव झाल्याचे ही जनपदे



आपल्याला दाखवतात. वंश वेगळे असूनही आपण आर्यावर्त, भारतवर्षाचे नागरिक आहोत हे त्याकाळी आपोआप मान्य झाले होते. आजच्यासारखे सांगावे लागत नव्हते. ब्रिटिशांनी वा पाश्चात्यांनी, आर्य भारताबाहेरून आले. इथली जनपदे आपापसात सतत भांडत होती व समाज नावाची संस्था अस्तित्वात नसल्याचे सतत बिबंवण्याचा प्रयत्न केला. गेल्या ७००० वर्षांचा भारतीय इतिहास व भूगोल असे सांगत नाही, हे आजच्या विज्ञान परीक्षणात सतत दिसून येत आहे.

सरस्वती आज जिवंत झाली आहे व उद्या सर्व नद्या जोडण्याची योजना ज्यावेळी साकार होईल त्याचा मूलस्रोतही ऋग्वेदातील सरस्वती नदीच राहणार आहे. रामायणकाली वा महाभारताच्या अंतकालापर्यंत (१९०० इ.स.पूर्वी) उत्तरभारताचा पर्वत, पठार नद्यांचा प्रदेश हिरवागार राहिल्याचे नासा, इस्रोच्या भूमी-सागर-अंतराळ परीक्षणात दिसून आले आहे. राजस्थान-थर-सिंध अशी सरस्वती नदी जोपर्यंत वाहती होती त्या काळाची चित्रांकने (ISRO,NASA) असे स्पष्टपणे दाखवतात की सरस्वतीचा मानससरोवर (कैलास पर्वत) ते सोमनाथजवळचे प्रभास तीर्थ असा १६०० किलोमीटर लांब व ६ ते ८ किलोमीटर रूंद पात्र प्रवास राजस्थान, सिंध, गुजरात, पंजाब, हरयाना, उत्तरांचल हा सारा भूभाग हिरवागार ठेवण्यास कारणीभूत झाला होता. हिरव्यागार प्रदेशामुळे व वेदकालापासूनच्या एकजिनसी समाजव्यवस्थेमुळे उत्तर-भारताच्या सर्व नद्या, पर्वत, पठारे वा सर्व जनपदांत स्थैर्य निर्माण झाले व आश्रमशाळा, शारदापीठ, (नीलामाता पुराण, राजतरंगिणी) तक्षशिला, नालंदा, श्रावस्ती, वल्लभी आदी ३५०० ते ४००० वर्षांच्या काळातील शिक्षणव्यवस्थेमुळे विद्यादानाचे व विज्ञानाचे नाते आपोआप निर्माण झाले. महाभारत व सर्व पुराणे यात आपल्याला भूगोलाचे जे दर्शन घडते व जे घटनासंदर्भ मिळतात त्यांची जुळणी आता होते आहे.

डॉ. एस बद्रीनारायण (भूगर्भ, माजी संचालक) डॉ. माधवन नायर (इस्रो), डॉ एस. कल्याणरामन, डॉ.पी.के. बॅनर्जी, अशा सुमारे २० तरी विविध क्षेत्रांतील व्यक्तींचे संशोधन असे दाखवते की आमचा भूगोल आम्हाला आमचा जो इतिहास सांगतो तो खरा आहे. पाश्चात्यांनी आमच्यावर लादलेला भारताबद्दलचा इतिहास पूर्वग्रहदूषित आहे.

ब्रिटिशांनी असा इतिहास आमच्यावर का लादला याचे महत्त्वाचे कारण तिकडे औद्योगिक क्रांती झाल्यावर (१८५० व नंतर) पाश्चात्यांना स्वतःच्या उद्योगांसाठी ज्या बाजारपेठा हव्या होत्या त्या आशिया, आफ्रिका व दोन्ही अमेरिकन खंडांत त्यांना आढळल्या होत्या. पाचशे वर्षांच्या या काळात प्राचीन भारतीयांप्रमाणे युरोपीय समाजात गरजेपोटी देशाटनाच्या प्रेरणा उत्पन्न झाल्या. कच्च्या मालाचे उत्पादन ही राष्ट्रे करतील व पक्का माल आपण बनवू ही ख्रिश्चन राष्ट्रांची प्रेरणा आवश्यकतेतून निर्माण झालेली स्वार्थी विचारसरणी होती.

भारतीय समाजाला प्राचीन समाज-व्यवस्था व शिक्षण पध्दतीमुळे मिळालेले स्वातंत्र्य; विशेषतः आर्थिक सुबत्ता यांच्याशी पाश्चात्यांची विचारसरणी पूर्णपणे विसंगत होती. त्यांच्या आवश्यकतेनुसार त्यांना इथला इतिहास व आर्थिक विकास व त्यानुषंगाने उभी असलेली उद्योगप्रवणता मूलतः खच्ची करण्याची गरज निर्माण झाली. त्यातून आमचा इतिहास बदलणे ब्रिटिशांना आवश्यक झाले. म्हणूनच आमचा इतिहास नव्याने लिहिणे आवश्यक आहे.

सरस्वती-सिंधू संस्कृतीचा वारसा सांगणारा ४००० किमी भूप्रदेश इसवी सनपूर्व ३५०० ते ५००० वर्षांपूर्वी अस्तित्वात आला होता असे रामायण-महाभारत सांगते. त्याचे पुरावे आजही जुने रस्ते आम्हाला दाखवतात. डॉ. भगवान सिंग सूर्यवंशी व डॉ. मोतीचंद्र यांची महाभारतकालीन भूगोलाची पुस्तके व इस्रो-नासाच्या परीक्षणातून हे सिद्ध झाले आहे.

भारतीय संस्कृतीच्या खाणाखुणा जगभर का सापडतात, काय आहेत त्या? नमस्कार हा वेदकालीन आहे. स्वस्तिक, चौकोन, त्रिकोण, वर्तुळ, सरळ रेषा, शून्य, गुणाकार, भागाकार, बेरीज, वजबाकी, अंतराळाचे अस्तित्व, हवामानाचे पृथ्वी व निसर्गाचे एकमेकांशी असलेले नाते जाणून घेण्याचा सर्वप्रथम प्रयत्न भारतीय संस्कृतीने केला होता. त्याला रामायण, महाभारत, उपनिषदे दुजोरा देतात व इस्रो, पुरातत्व सागर संशोधने आम्हाला दाखवतात. डॉ. एस.आर. रावांचे द्वारका संशोधन, डॉ. बद्रीनारायण, डॉ. पी.के. बॅनर्जी, डॉ. सुरेश भावे, डॉ. एस. कल्याणरामन, डॉ. मधुसूदन चान्सरकर, डॉ. विनायक वाकणकर यांची सर्वेक्षणे जागतिक स्थरांवर मान्यताप्राप्त आहेत. त्यावरून भारतीय संस्कृती ही एक विज्ञानाधिष्ठित आद्य संस्कृती आहे हेच सिद्ध होते. ७ ते ८ हजार वर्षांपूर्वी केवळ सरस्वती, सिंधू प्रदेशात १६०० ते २००० वसाहती नांदत होत्या. मोहेनजोदाडो, हडप्पा, कालिबंगा, बनावली, रुपार, लोथल यांचे इस्रो संकलन झाले आहे. भारतीय संस्कृतीत संस्कृत आधी बोली व नंतर लिपी असणारी भाषा आहे. त्यातील विज्ञाने, नावे आजच्या इंग्रजी भाषेसारखीच सर्वमान्य आहेत. संस्कृत ही भाषा शाळेपासून शिकवली जाते. संस्कृत ही मूलभूत ज्ञानाचा म्हणजेच विज्ञानाचा फार मोठा संग्रह आहे. ही संकल्पना संस्कृत शिकणाऱ्याला व शिक्षक वर्गाला प्रथमपासून दिली गेल्यास प्राचीन विज्ञानांचा अभ्यास व आध्यापनाशी संबंधित नवे संशोधक तरुण पिढीतून निर्माण होतील.

– अरुण निगुडकर
पितृकृपा ब्लॉक २, रोड १६,
चेंबूर जिमखान्यासमोर, मुंबई ४०० ०७१
फोन नं. २५२१२९९६
arun.7g.usha@gmail.com